सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
वर्ष - ४ थे | अंक - १४ वा | अमरावती (महाराष्ट्र) | बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -६

# लोकसभेत पुन्हा गदारोळ, कामकाज स्थगित

## शेती, डेअरीमध्ये भारताचे अधिकार सुरक्षित - पीयूष गोयल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली**

भारत - अमेरिकेत झालेला द्विपक्षीय व्यापार करारावर आज लोकसभेत चर्चा होत आहे. मंत्री पीयूष गोयल हे करारासंबंधी माहिती देत होते. दरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांनी स्थगन प्रस्ताव दाखल केला. मात्र लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्थगन प्रस्तावाच्या कोणतीही नोटीसला परवानगी दिली नाही. या गोंधळातच पीयूष गोयल यांनी अमेरिकेसोबतच्या कराराची माहिती सभागृहाला देण्यास सुरुवात केली. विरोधी पक्षाचे सदस्य घोषणाबाजी करत वेलमध्ये उतरले. त्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरु केली. लोकसभाध्यक्षांच्या वारंवार विनंतीनंतरही खासदार जागेवर गेले नाही. यामुळे सुरुवातीला दुपारी १२ आणि नंतर २ वाजतापर्यंत कामकाज स्थगित करण्यात आले. दुसरीकडे निलंबित सदस्यांचे सभागृहाबाहेर आंदोलन सुरु आहे. यावेळी विरोधी पक्षनेते राहुल गांधी देखील आंदोलनात सहभागी झाले होते.

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरु असताना मंगळवारी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जुंपली होती. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी चीन संबंधी माजी लष्कर प्रमुख एम.एम. नरवणे यांच्या पुस्तकाचा हवाला दिला. यावरुन गदारोळ झाला. सत्ताधाऱ्यांनी पुस्तक प्रकाशित नाही त्यामुळे त्याचा उल्लेख करता येणार नाही असे म्हणत राहुल गांधी यांना बोलण्यास विरोध केला. विरोधी पक्षातील खासदारांनी पीठासीन अधिकाऱ्यांच्या दिशेने कागदाचे तुकडे भिरकावले. यामुळे विरोधी पक्षातील आठ खासदारांना निलंबित करण्यात आले होते.

**भारत-अमेरिका ऐतिहासिक करार**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सहाव्या दिवशी वाणिज्य मंत्री पीयूष गोयल हे लोकसभेत भारत आणि अमेरिका यांच्यातील टॅरिफ डीलवर निवेदन करत होते. त्यांनी हा ऐतिहासिक करार असल्याचे म्हटले. यामध्ये भारताने कृषी आणि खाद्य क्षेत्राचा पुरेपूर विचार केला आहे. भारताच्या विकासामध्ये हा करार अतिशय फायदेशीर ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.

पीयूष गोयल यांच्या भाषणादरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांनी 'विरोधी पक्षनेत्यांना बोलू द्या' म्हणून आग्रह धरला. नरेंद्र मोदी - सरेंडर मोदी', 'डरता है डरता है नरेंद्र मोदी डरता है' अशी घोषणाबाजी सुरु केली. विरोधी खासदारांच्या घोषणाबाजीने लोकसभेत एकच गोंधळ झाला. लोकसभाध्यक्ष बिर्ला यांनी विनंती केल्यानंतरही खासदार आपल्या स्थानावर गेले नाही. दुपारी २ पर्यंत कामकाज स्थिगत करण्यात आले.

**पंतप्रधान संध्याकाळी लोकसभेला संबोधित करणार**

त्याआधी लोकसभेतून निलंबित करण्यात आलेल्या आठ खासदारांनी संसदेच्या प्रवेशद्वारासमोरील पायऱ्यावर आंदोलन केले. त्यांच्या हातात विविध पोस्टर्स आणि बॅनर होते. त्यावर पंतप्रधान मोदी, माजी आर्मी चीफ एम.एम. नरवणे आणि जेफ्री एपस्टीन यांचे फोटो होते. त्यावर लिहिले होते, 'पीएम इज कॉम्प्रमाईज्ड' अर्थात पंतप्रधानांनी हातमिळवणी केली आहे.

या खासदारांना लोकसभा पीठासीन अधिकाऱ्यांवर कागद भिरकवाल्या प्रकरणी अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत निलंबित करण्यात आले आहे. आज सकाळी लोकसभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर भारत-अमेरिका व्यापर करारावरुन विरोधकांनी गदारोळ सुरु केला. त्यानंतर सुरुवातीला दुपारी १२ आणि नंतर दुपारी २ वाजतापर्यंत लोकसभेचे कामकाज स्थगित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी ५ वाजता राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाला उत्तर देणार आहेत.

# 'त्या' बैठकीनंतर अजितदादांचा मला फोन आला होता; राष्ट्रवादीचे विलीनीकरणावर सुनील तटकरेंचा मोठा दावा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

शपथविधीची घाई का झाली याबद्दल अनेक प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. तसं विलीनीकरणाची चर्चासुद्धा स्व. अजितदादांवर अंत्यविधी होण्यापूर्वी का कुणी सुरू केली, सतत मुलाखतींचा फेऱ्या का सुरू ठेवल्या त्यामागे कारणे काय होती? विलीनीकरण ही धोरणात्मक बाब आहे परंतु त्याचा उपमुख्यमंत्रिपदाचा, विधिमंडळ नेतेपदाचा कसा दुरान्वये संबंध येतो हे मला राजकीय कुणी समजून सांगितले तर नक्कीच मी त्यावर भूमिका मांडेन. जो व्हिडिओ फिरवला जातोय, त्यानंतर अजितदादांचा मला फोन आला होता असं सांगत सुनील तटकरे यांनी विलीनीकरणावरून मोठा दावा केला.

सुनील तटकरे म्हणाले की, राष्ट्रवादी विलीनीकरणाचा मुख्य मुद्दा आहे. मी वारंवार विचारतोय कोणता पक्ष कोणत्या पक्षात विलीन होणार आहे. पण दुर्दैवाने त्यावर कुणी बोलत नाही. एकबाब म्हणजे ही चर्चा कुठल्या टप्प्यावर कोण सुरू करणार हा प्रश्न पुढे आहे. मी ८-१० महिन्यांपासून सतत म्हणत आलोय, आम्ही भाजपासोबत आहोत. एनडीएत आहोत हे ज्यांना मान्य असेल तेच आमच्यासोबत विलीनीकरणाची चर्चा करू शकतात नाहीतर चर्चा करण्याचे कारण नाही. जर हे मान्य असेल तर त्याबाबत पुढे चर्चा कोण, कधी करणार हे आता सांगता येणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुणे, पिंपरी महापालिका एकत्रित लढण्याचा निर्णय झाला त्याची माहिती आम्हाला दादांनी दिली. त्यानंतर वेगवेगळ्या वाहिन्यांना दिलेल्या मुलाखतीत विलीनीकरणाबाबत अजितदादांनी स्पष्ट भूमिका मांडली. अजितदादांची आणि माझी भेट झाली. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला एकत्रित पुढे जायचे आहे तसं बोलणे झाले होते. दुसऱ्या दिवशी बारामतीत कृषी प्रदर्शन होते. त्यावेळी अजितदादांसोबत बैठकीचा व्हिडिओ आता फिरतोय. परंतु त्यानंतरच्या पत्रकार परिषदेत अजित दादांनी सांगितले की, जिल्हा परिषद निवडणुकीत बहुतांश ठिकाणी एकाच चिन्हावर लढवली जाईल. त्यावेळी दादांनी मला फोन केला. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी निवडणूक होतेय तिथे शक्य असेल तिथे घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढवावी, आपल्या सहकाऱ्यांनी तशी भूमिका घ्यावी असं दादांनी मला सांगितले होते असं त्यांनी स्पष्ट केले. टीव्ही ९ च्या मुलाखतीत ते बोलत होते.

**मी विरोध करण्याचं कारण नाही...**

विलीनीकरणाला माझा विरोध आहे की नाही हा मुद्दा बिल्कुल गौण आहे. दादांचा विश्वासू सहकारी म्हणून गेली ४० वर्षे मी काम करत आलोय. मी दादांचा विश्वासू सहकारी असल्याने अनेक वेळेला माझ्यावर कायम आक्षेप घेतले गेलेत. उद्या माझ्यावर बोलण्याची वेळ येईल तेव्हा मी यावर जरूर बोलेन. पण दादांचा निर्णय जे मी मागील ३० वर्षापासून मानत आलो तसेच विलिनीकरणाचा निर्णय असता तर माझा त्याला विरोध असण्याचे कारण नव्हते. दादांना हा विश्वास होता, मी जे बोलेल ते सुनील तटकरे मान्य करेल. दादांची आणि माझी वेगवेगळ्या विषयावर चर्चा व्हायची. त्यावेळी मी माझे मत मांडायचो. पण नेता म्हणून दादांनी निर्णय सांगितला तर त्यावर अंमलबजावणी करणे या भूमिकेतून सुनील तटकरे दादांच्या कार्यपद्धतीत काम करत आला आहे असंही तटकरेंनी खुलासा केला.

**विलीनीकरणाबाबत भाजपाशी चर्चा आवश्यक**

राष्ट्रवादी काँग्रेस हा एनडीएचा घटक पक्ष आहे. एनडीए म्हणजे भाजपा प्रणित मित्रपक्ष हे स्पष्ट आहे. यूपीए म्हणजे कोण तर काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष... जेव्हा एनडीएत सहभागी होण्याचा निर्णय घेतला तेव्हा आमच्या भूमिकेला भाजपाने होकार दर्शवला. त्यानंतर आम्ही मंत्रिमंडळात सहभागी झालो. विधानसभा एकत्र लढवल्या. अशावेळी विलीनीकरणाबाबत भाजपाशी चर्चा करणे स्वाभाविक आहे. जेव्हा राज्यात महाविकास आघाडी सरकार आले. त्यावेळी यूपीएमध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस होती. शिवसेना नव्हती. २०१९ साली पर्यायाने शिवसेनेला यूपीएत समाविष्ट करण्यासाठी सोनिया गांधी यांची परवानगी मागितली ना...कारण यूपीएच्या त्या महत्त्वाच्या घटक आहेत. त्यामुळे ज्या पक्षाच्या नेतृत्वात राजकीय आघाडी किंवा युतीची वाटचाल होते तेव्हा त्या मित्रपक्षांशी चर्चा करणे स्वाभाविक आहे असं सांगत राष्ट्रवादी विलीनीकरणावर भाजपाशी चर्चा करण्यावर तटकरेंनी भर दिला.

# राऊत कुणाचे प्रवक्ते हे त्यांनी ठरवून घ्यावे ते शरद पवारांचे दलाल झालेत का?

## पाय राष्ट्रवादीत, हात काँग्रेसमध्ये; डोकं तरी उबाठात आहे का? - नवनाथ बन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

उबाठाचे खासदार जनाब संजय राऊत यांनी सकाळी सकाळी गांजा ओढून पत्रकार परिषद घेतली आहे. भाजपबद्दल खोटे बोलणं आणि आरोप करणे हा त्यांचा धंदा झाला आहे, राऊत हे उबाठाचे प्रवक्ते होते की पवार कुटुंबियांचे प्रवक्ते होते की का काँग्रेसचे प्रवक्ते आहेत असा प्रश्न पडावा अशी पत्रकार परिषद त्यांनी घेतली, असा टोला भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी लगावला आहे. नको तिथे नाक खूपसणे आणि नको त्या गोष्टीवर बोलणं हा त्यांचा धंदा झाला आहे. त्यांनी कोणत्या पक्षाचे प्रवक्ते आहेत ते त्यांनी ठरवून घेतले पाहिजे.

नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत हे पवार कुटुंबियांचे मुखिया झाले आहेत का? ते शरद पवारांचे दलाल झाले आहेत का माझा त्यांना सवाल आहे. प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आहेत. राऊत शरद पवार गटाचे काही भाग आहात का हे महाराष्ट्राला सांगितले पाहिजे. तुम्ही राहतात उबाठात खातात शरद पवारांचे आणि प्रफुल्ल पटेलांबद्दल भूमिका मांडतात. शरद पवार हे अजित पवारांचा अपघात झाले म्हणाले असताना तुम्ही त्याबद्दल शंका उपस्थित करताय तुम्ही कुठल्या कुटुंबाचे मुखिया आहात हे तुम्ही स्पष्ट केले पाहिजे. त्यांना प्रवक्ते, मुखिया, दलाल म्हणून नियुक्त केले आहे का? असा खोचक सवाल बन यांनी केला आहे.

**राऊतांनी इतरांची प्रवक्तेगिरी बंद करावी**

नवनाथ बन म्हणाले की, प्रफुल्ल पटेल यांचे पाय कुठे आहेत हे सांगण्याच्या भानगडीत संजय राऊत यांनी पडू नये. संजय राऊत यांचे दोन पाय राष्ट्रवादीत तर हात काँग्रेसमध्ये आहेत, त्यांचे डोकं तरी उबाठामध्ये आहे का हा माझा सवाल आहे. सातत्याने वेगवेगळ्या भूमिका घेणं हे त्यांचे काम झाले आहे, त्यांनी उबाठामध्ये डोकं तरी ठेवले आहे का? आपले डोकं त्यांनी डाव्याच्या बाजूला नेऊन ठेवले आहे का हे सांगितेल पाहिजे. इतरांची प्रवक्तेगिरी करणे राऊतांनी बंद करावे.

**त्यावेळी राऊतांच्या डोक्यात प्रकाश पडेल**

नवनाथ बन म्हणाले की, प्रफुल्ल पटेल हे महाराष्ट्राला पटेल अशीच भूमिका घेत आहेत. पण ज्यावेळी शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती त्यावेळी तारीख अन्वर, अरुण गुजराथी, पी.ए.संगमा कोण होते? असा सवाल बन यांनी केला आहे. पटेल काही राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष झालेले नाही, त्यांच्या पक्षाचे नेतृत्व सुनेत्रा पवार याच करणार आहेत. राऊतांनी सामनाचे मागचे संपादकीय वाचावे मग तुमच्या डोक्यात प्रकाश पडेल.

# पार्थ अन् जय यांची शरद पवारांसोबत २ तास चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४बारामती**

अजित पवार यांचे बारामती येथे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. या घटनेने संपूर्ण राज्याला मोठा धक्का बसला. यानंतर राज्याच्या राजकारणात अनेक मोठमोठ्या घडामोडी घडल्या. एकीकडे त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, तर दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा नेत्यांमध्ये झाल्याचे समोर आले. स्वतः शरद पवार यांनी विलीनीकरणाची चर्चा अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यामध्ये झाल्याचे सांगितले. तसेच, विद्या प्रतिष्ठानमध्ये अजित पवार यांचे स्मारक उभारणार असल्याची चर्चा सुरु झाली. अशामध्ये बुधवारी (४ फेब्रुवारी) दिवंगत अजित पवार यांचे पुत्र पार्थ आणि जय पवार आणि शरद पवार यांच्यामध्ये बैठक झाली.

बारामती येथील विद्या प्रतिष्ठानमध्ये शरद पवार यांच्यासोबत पार्थ आणि जय पवार यांची बैठक झाली. यावेळी त्यांच्यामध्ये तब्बल २ तास चर्चा झाल्याची माहिती आहे. आधी पवार कुटुंबीय आणि प्रतिष्ठानचे विश्वस्त यांच्यात बैठक पार पडली. शरद पवार हे या विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष असून दिवंगत अजित पवार हे विश्वस्त होते. अजित पवार यांच्या जागी विश्वस्त म्हणून पार्थ किंवा जय पवार यांना घेण्यात येणार असल्याची चर्चा आहे. तर, अजित पवार यांच्या स्मारकाबाबत चर्चा झाल्याचे कळते. या बैठकीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणावर ज्या राजकीय चर्चा सुरू असून त्यावर ही चर्चा झाल्याचे समजते. कारण, या बैठकीनंतर अजित पवार यांचा ज्या ठिकाणी अंत्यविधी करण्यात आला होता, त्या विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर जय पवार आणि पार्थ पवार यांनी पाहणी केली आहे.

**अजित पवारांच्या पदांचे काय होणार?**

अजित पवार हे माळेगाव साखर कारखाना चेअरमन, विद्या प्रतिष्ठानचे प्रमुख विश्वस्त, महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनचे अध्यक्ष पद, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे सदस्य, रयत शिक्षण संस्था संचालक, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ अध्यक्ष अशा विविध पदांवर कार्यरत होते. या पदांवर आता पवार कुटुंबातील सदस्यांची नेमणूक होण्याची शक्यता आहे. काही महत्त्वाची पदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे जाणार असल्याची माहिती देण्यात येत आहे. जय पवार आणि पार्थ पवार यांच्याकडे कोणती पदे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राहुल गांधींचा केवळ चर्चेत राहण्याचा प्रयत्न; देवेंद्र फडणवीसांनी एका वाक्यात विषय संपवला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही जोरदार टीका केली आहे. राहुल गांधी हे गंभीर मुद्द्यांवर तथ्याधारित चर्चा करण्याऐवजी सातत्याने खोटे आरोप करत असल्याचा आरोप त्यांनी केला. राहुल गांधींना बोलायचे नसून केवळ आरोप करायचे आहेत. आपल्या देशाला, आपल्या लष्कराला बदनाम करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, असा घणाघाती हल्ला फडणवीसांनी चढवला. असे आरोप करून ते फक्त चर्चेत राहण्याचा प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान मुंबईत युवक काँग्रेसच्या वतीने राहुल गांधींना संसदेत बोलू दिले जात नसल्याचा आरोप करत तीव्र निदर्शने करण्यात आली. सरकार आणि पंतप्रधान मोदी काँग्रेसला आणि राहुल गांधी यांना घाबरत असल्याचा दावा या आंदोलकांनी केली आहे. या वेळी या आंदोलकांमध्ये आणि पोलिसांमध्ये झटापट झाल्याचेही पाहायला मिळाले.

**लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचे नाव**

राज्यातील लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचे नाव देण्याच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच स्पष्ट भूमिका मांडली आहे. या विषयावर विविध स्तरांतून मागण्या येत असल्याचे मान्य करताना, कोणताही निर्णय घाईघाईने न घेता सर्व बाबींचा विचार करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे फडणवीस म्हणाले. ही योजना राज्यातील महिलांसाठी महत्त्वाची असून तिच्याशी संबंधित कोणताही बदल हा चर्चेतून आणि सामूहिक निर्णयातूनच केला जाईल, असेही त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

**विरोधकांकडून केवळ आरोपांचे राजकारण सुरू**

फडणवीस म्हणाले की, देशाच्या सुरक्षिततेशी आणि प्रतिष्ठेशी संबंधित विषयांवर राजकारण करणे योग्य नाही. राहुल गांधींकडून होणारी वक्तव्ये ही जबाबदार नेतृत्वाला साजेशी नसून ती देशहिताला धक्का पोहोचवणारी आहेत, असा आरोपही त्यांनी केला. एकीकडे लाडकी बहीण योजनेसारख्या सामाजिक योजनांबाबत सरकार संवेदनशीलतेने निर्णय घेण्याच्या भूमिकेत आहे, तर दुसरीकडे विरोधकांकडून केवळ आरोपांचे राजकारण सुरू आहे, असा अप्रत्यक्ष टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी लगावला.

राहुल गांधींकडून होणारी वक्तव्ये ही जबाबदार नेतृत्वाला साजेशी नसून ती देशहिताला धक्का पोहोचवणारी आहेत, असा आरोपही त्यांनी केला. एकीकडे लाडकी बहीण योजनेसारख्या सामाजिक योजनांबाबत सरकार संवेदनशीलतेने निर्णय घेण्याच्या भूमिकेत आहे, तर दुसरीकडे विरोधकांकडून केवळ आरोपांचे राजकारण सुरू आहे, असा अप्रत्यक्ष टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी लगावला.

# अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी १२ हेक्टर जागा मंजूर

## देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय
## १०० विद्यार्थी प्रवेश : ४३० खाटांच्या रुग्णालय : तीन वर्षांत बांधकाम पूर्ण करण्याची अट : जागा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतर






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

अमरावती जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालयाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे, अमरावती जवळील आलियाबाद येथील ११.२९ हेक्टर जमिनीचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे सोपवण्यास महसूल विभागाने मंजुरी दिली. याबाबतचा निर्णय बुधवारी जारी करण्यात आला आहे.

या जागेवर १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या महाविद्यालयाला संलग्न ४३० रुग्णखाटांचे अद्ययावत रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या नियोजित प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक असल्याचे आदेशात म्हटले आहे.

जमीन 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने मूल्यरहित आणि कब्जेहक्काने प्रदान करण्यात आली आहे. जमिनीच्या वापराबाबत शासनाने काही महत्त्वाच्या अटी घातल्या आहेत.

महसूल विभागाच्या परवानगीशिवाय या जमिनीची विक्री, देणगी, गहाण किंवा कोणत्याही खाजगी-सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर हस्तांतरण करता येणार नाही.

> या निर्णयामुळे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण पश्चिम विदर्भातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होईल.जिल्ह्यातील नागरिकांची ही मागणी होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मिळू शकले. आरोग्यसेवा म्हणजे ईश्वरसेवा, हा सरकारचा ध्यास आहे. पालकमंत्री या नात्याने मुख्यमंत्र्यांचे मी मनपूर्वक आभार मानतो.
>
> **चंद्रशेखर बावनकुळे,**
> **महसूल मंत्री, पालकमंत्री अमरावती**

## संपादकीय ......

# शुल्क कपातीची 'ट्रम्पे'ट!

*युरोपीय महासंघाने 'मदर ऑफ ऑल डील्स' संबोधला जाणारा व्यापार करार भारतासोबत केल्यानंतरच्या काही दिवसांतच अमेरिकेनेही भारतावरील आयात शुल्कात कपात करण्याचे जाहीर केले. सोमवारी रात्री झालेल्या या घोषणेने उभय देशांतील व्यापार कोंडी एकदाची फुटली. तत्पूर्वी व्यापार करार कधी होतोय, याची उत्सुकता भारताला लागली होती. शिवाय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरी स्वभावामुळे अनिश्चिततेच्या वातावरणात भरच पडत होती. अमेरिकेने अनेक देशांशी व्यापार युद्ध पुकारताना भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादले. त्यामुळे केंद्रीय अर्थसंकल्पातदेखील उत्पादन व निर्यात क्षेत्रांच्या प्रगतीसाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या होत्या; पण आता अमेरिकेने आयात शुल्क कमी केल्याने केवळ उभय देशांचेच नव्हे, तर जगाचेही हित साधले जाण्याची आशा आहे.*

*भारतावरील हे शुल्क आता १८ टक्के असेल आणि त्याची अंमलबजावणी तत्काळ प्रभावाने लागू होईल, असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून संभाषण झाल्यानंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली असून, मोदी यांनी ट्रम्प यांचे त्यासाठी आभार मानले. तथापि, या बदल्यात भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवण्याचे मान्य केले आहे. तसेच भारत अमेरिकेकडून ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी, कोळसा आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये ५०० अब्ज डॉलर्सची खरेदी करणार असल्याचेही अमेरिकेने जाहीर केले. याबरोबरच भारतदेखील अमेरिकेवरील आयात शुल्क घटवत ते शून्यापर्यंत आणेल, असाही दावा अमेरिकेतर्फे करण्यात आला.*

*'माझे मित्र, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी संवाद साधून खूप आनंद झाला. 'मेड इन इंडिया' उत्पादनांवर आता १८ टक्के इतके कमी शुल्क लागू होणार असल्याचा निर्णय अतिशय आनंददायी आहे. या निर्णयाचा थेट फायदा भारतीय उद्योग, निर्यातदार आणि अर्थव्यवस्थेला होणार आहे,' असे मोदी यांनी म्हटले आहे. जेव्हा जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्था आणि सर्वात मोठे लोकशाही देश एकत्र काम करतात, तेव्हा त्याचा थेट फायदा नागरिकांना होतो. अशा सहकार्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात. ही व्यापारी भागीदारी केवळ द्विपक्षीय स्तरावरच नव्हे, तर जागतिक आर्थिक स्थैर्यासाठीदेखील महत्त्वाची ठरणार आहे. या सहकार्याला अभूतपूर्व उंचीवर नेण्यासाठी मी ट्रम्प यांच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे, असे मोदी यांनी म्हटले आहे; परंतु भारत रशियाकडून करत असलेली तेल खरेदी यापुढे थांबवेल, असे कोणतेही आश्वासन भारताने दिल्याचे मोदी यांनी म्हटलेले नाही.*

*अमेरिकेकडून अमुक इतक्या रकमेचा माल खरेदी करू वा अमेरिकन उत्पादनांवर शुल्कच आकारणार नाही, असा कोणताही शब्द भारतातर्फे दिल्याचा मोदी यांच्या प्रतिक्रियेत उल्लेख नाही. यामुळे या कळीच्या मुद्द्यावर पुरेसा खुलासा होणे बाकी आहे. भारताने यापुढे रशियाऐवजी व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्याचे मान्य केले आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले असले, तरीदेखील भारताने अशी कोणतीही घोषणा केलेली नाही. ट्रम्प यांच्या घोषणेमुळे आता हा बहुप्रतीक्षित द्विपक्षीय व्यापार करार पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे कराराची घोषणा कधीही होऊ शकते, असे संकेत वाणिज्य सचिव राजेश अग्रावाल यांनी दिले आहेत.*

*साहजिकच कराराचा मार्ग प्रशस्त होईल. कराराची घोषणा झाल्यावर घसरलेली निर्यात पुन्हा एकदा भरधाव वेगाने वाढू शकेल, अशी आशा आहे. भारताचा विकास दरही सात टक्क्यांवरून आणखी काही प्रमाणात वाढण्याची आशा आहे. अमेरिकेने अलीकडेच दोनशेहून अधिक भारतीय कृषी आणि अन्न उत्पादनांना वाढीव शुल्कातून सूट दिली. याचा थेट फायदा चहा, कॉफी, मसाले, काजू आणि प्रक्रिया केलेले अन्न यांच्या व्यापाऱ्यांना होणार आहे. कर कमी केल्यामुळे या भारतीय वस्तू अमेरिकन बाजारपेठेत स्वस्तात विकता येतील. त्यामुळे मागणी वाढून याचा फायदा संबंधित शेतकऱ्यांना होणार आहे. ट्रम्प यांनी तर उभय देशांत व्यापार करार झाल्याचीच घोषणा करून टाकली.*

*शुल्क कपातीच्या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्वागत केले आहे. महाराष्ट्र हे कायम निर्यातीत अग्रेसर असलेले राज्य आहे. त्यामुळे भारत-अमेरिका मैत्री वृद्धिंगत झाल्या कारणाने राज्यातील व्यवसायांसाठी नवे क्षितिज खुले होईल. डेटा सेंटर्स, आर्टिफिशियल इंटलिजन्स आणि अन्य क्रांतिकारी तंत्रज्ञानांमध्ये महाराष्ट्राला मोठी गुंतवणूक प्राप्त होईल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. शुल्क कपातीनंतर सेन्सेक्स प्रचंड उसळला. माघारी फिरत असलेली परदेशी संस्थागत गुंतवणूक आता पुन्हा येऊ लागेल आणि घसरलेला रुपया लक्षणीय प्रमाणात सावरेल, ही बाजाराची अपेक्षा अनाठायी नाही. अमेरिकेने ब्राझीलवर ५० टक्के, चीनवर ३७, दक्षिण आफ्रिका ३०, बांगला देश २०, मलेशिया १९ व पाकिस्तानवरही १९ टक्क शुल्के लावलेले आहे. बांगला देश व पाकिस्तानवर अगोदरच याच पातळीवर शुल्क लावण्यात आले होते. त्या तुलनेत अमेरिकेने भारतावर अन्यायच केला होता; मात्र भारताने युरोपियन महासंघ, ब्रिटन, ओमान, संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया आणि मॉरिशससह अनेक देशांशी व्यापारी करार करून, अमेरिकेच्या दबावापुढे आम्ही झुकत नाही, हे दाखवून दिले. अर्थात, काही प्रमाणात भारतालाही अमेरिकेच्या मागण्या मान्य कराव्या लागणार आहेत, हे नाकारण्याचे कारण नाही, तरीदेखील येथील शेतकऱ्यांचे हित जपावेच लागेल.*

*परराष्ट्र संबंधात देवघेव आणि त्यासाठी धोरणात लवचिकता आणावी लागते. आशियात चीनला शह देण्यासाठी भारतासारखा मित्र अमेरिकेलाही हवा आहे. आपल्या काही मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी ट्रम्प हे शुल्काचे हत्यार उगारतात आणि नंतर ते मागे घेतात, हा अनुभव आहे. त्यांच्या दबावामुळे न घाबरता आक्रमक धोरण राबवल्यास ट्रम्प हे एकदम बचावात्मक पवित्र्यात जातात. हे ठाऊक असल्यामुळेच पंतप्रधान मोदी आणि परराष्टमंत्री जयशंकर यांनी ट्रम्प यांना कौशल्याने हाताळलेले दिसते. उभय देशांतील कोंडी फुटली, ही त्याची परिणती.*

## साठवणूकीत कडधान्यांना कशामुळे लागते किड? काय आहेत कारणे? जाणून घ्या सविस्तर




**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

कडधान्याला किड लागण्याची कारणे साठवणूकीत कडधान्याचे नुकसान करणाऱ्या भुंगेऱ्यांचा प्रादुर्भाव शेतात पीक परिपक्व झाल्यापासूनच दिसून येतो.

ही कीड पक्व झालेल्या शेंगा अथवा दाण्यावर आपली अंडी घालते व अळी प्रादुर्भावग्रस्त पिकाची मळणी केल्यास ही कीड साठवणुकीत येऊन कडधान्याचे नुकसान करते.

धान्य साठवणुकीतील जागेत असलेल्या भेगा फटीमध्ये वास्तव्य करणारे भुंगेरे नवीन धान्याला क्षतीग्रस्त करतात. जुनी पोती व साठवणुकीच्या साधनांमार्फतसुध्दा या किडींचा प्रसार होतो.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पोत्याच्या किंवा जुन्या साठवणूकीच्या कोपऱ्यात हे किडे वास्तव्य करतात. वाहतूकीची साधणे जसे बैलगाडी, ट्रेलर किंवा ट्रॅक्टर ट्रॉलीपासूनही या किडींचा प्रसार होतो.

साठवणुकीचा विचार केल्यास कडधान्याला इतर धान्याच्या तुलनेत किडींचा जास्त प्रादुर्भाव होतो. मूग, उडीद, तूर, वाटाणा, रंगाचे २ ठिपके असतात.

या भुंगेऱ्याची मादी कडधान्यावर एक एक करून जवळजवळ ९० अंडी देते. अंडी अवस्था ४ ते ५ दिवस असते. चवळी तसेच हरभरा या कडधान्यात कॅलासोब्रुकस भुंगेरा अतोनात नुकसान करतो.

पूर्ण वाढलेला भुंगेरा गडद चॉकलेटी रंगाचा ६ ते ७ मिमी लांब असतो. फुगीर लांबट गोल भुंगेऱ्याच्या पाठीवर राखाडी या किडीची अळी गुबगुबीत पांढऱ्या रंगाची सुरकुत्या असलेली असते.

अळी धान्यात शिरून उपजिवीका करते. अळी अवस्था १५ ते २० दिवसात पूर्ण होते. कोषावस्था ४ ते ८ दिवसात दाण्याच्या आत पूर्ण होते. पूर्ण वाढलेला भुंगेरा दाण्यास छिद्र पाडून बाहेर येतो.

प्रौढ भुंगेरा साधारणतः १० दिवस जगतो. प्रौढ भुंगेऱ्याला पंख असल्यामुळे कोठारापासून उडून शेतात जातो व कापणीआधी किंवा कापणीनंतर धान्यावर किंवा शेंगावर अंडी घालतो.

कडधान्य शेतात असताना घ्यावयाची काळजी

कापणीनंतर धान्य खळ्यात किंवा शेतात असल्यास त्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्क्यांच्यावर असते. या कालावधीत तापमान जवळपास ३० अं. सेल्सिअस तर हवेतील आर्द्रता ७५ टक्क्याच्या वर असते.

या बाबी कीड व रोगाच्या वाढीला अतिशय अनुकूल असल्याने किडींचा प्रादुर्भाव वाढतो. बुरशीची वाढ झाल्यामुळे तूर हे कडधान्य टणक होते व लवकर शिजत नाही.

तूरीच्या पेंड्यांना बुरशीपासून वाचविण्यासाठी त्या शेतात किंवा खळ्यात उभ्या करून ठेवाव्या. पेंड्या बांधतांना थोड्या सैल बांधल्यास हवा खेळती राहून धान्य लवकर वाळण्यास मदत होते व बुरशीचा प्रादुर्भावही टाळता येतो.

ज्या कडधान्याच्या पेंड्या बांधणे शक्य होत नाही. उदा. उडीद, मूग, चवळी त्यांना टणक कोरड्या उंचवट्याच्या जागेवर साठवून नियमितपणे त्यांची उलटणी करत रहावी.

खरीप मूग व उडीद कापणीच्या वेळेस ओलसर वातावरण असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. ते टाळण्यासाठी शेतात गरजेनुसार ५४५ मी ते १०१५ मी. आकाराचे ओटे तयार करून तात्पुरत्या तंबू किंवा प्लास्टिक आच्छादनाची व्यवस्था करणे महत्वाचे ठरते.

## ७ दिवस १ पदार्थ आठवड्यातून एकदा खा-तुमचं वजनच वाढणार नाही



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

वजन कमी करण्यासाठी किंवा आहे ते वजन नियंत्रित ठेवण्यासाठी जवळपास प्रत्येकाचीच धडपड सुरू असते. तुमच्या वजनावर सगळ्यात जास्त परिणाम करणारी गोष्ट म्हणजे तुमचा आहार.




जर आहार उत्तम असेल तर वजन नियंत्रित राहण्यास आणि एकंदरीतच तब्येत उत्तम राहण्यास मदत होते. म्हणूनच आपल्या आहारात पुढे सांगितलेले काही अतिशय पौष्टिक पदार्थ असायलाच हवेत आठवड्यातून एकदा तरी तुम्ही हे पाचही पदार्थ खायलाच हवेत, असं एक्सपर्ट सांगतात.

पौष्टिक पदार्थांपैकी एक आहे इडली सांबार. या पदार्थामध्ये फर्मेंट केलेले कार्बोहायड्रेट्स असतात. इडली पचायला हलकी असते. जेव्हा तुम्ही इडल्या भरपूर भाज्या घातलेल्या सांबारसोबत खाता तेव्हा तो एक संतुलित आहार असतो. कारण भाज्यांमधून फायबर, व्हिटॅमिन्स, खनिजे मिळतात तर डाळींमधून प्रोटीन्स मिळते.

दुसरा पदार्थ आहे खिचडी. मुगाची डाळ आणि भाज्या यांचं प्रमाण जास्त ठेवून केलेली खिचडी पचायला सोपी असते आणि शिवाय ती इम्युनिटी वाढायलाही मदत करते.

हरबरा डाळीचं धिरडं हा देखील एक अतिशय पौष्टिक पदार्थ आहे. कारण त्यामधून भरपूर प्रमाणात प्रोटीन्स मिळतात. त्यामुळेच जर तुम्ही नाश्त्यामध्ये धिरडं खाल्लं तर तुमची भूक आणि शुगर क्रेव्हिंग दोन्हीही नियंत्रणात राहाते. धिरडं करताना त्यात जर भाज्या घातल्या तर ते अधिक पौष्टिक होतं.

वरण किंवा डाळ, भाजी, पोळी, सलाड आणि दही असे सगळे पदार्थ तुमच्या पानात असतील तर तो देखील एक संतुलित आहार आहे. कारण त्यामधून प्रोटीन्स, फायबर, व्हिटॅमिन्स, खनिजे, प्रोबायोटीक्स, मायक्रोन्युट्रियंट्स आणि कार्ब्स असं सगळंच योग्य प्रमाणात मिळतं.

भाज्या घालून केलेला दलिया हा देखील एक चांगला पदार्थ आहे. कारण त्यातून फायबर चांगल्या प्रमाणात मिळते शिवाय त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने तो मधुमेह असणाऱ्या व्यक्तींनाही चालतो. तसेच तो वेटलॉस करणाऱ्यांसाठीही योग्य आहार मानला जातो.

## राज्य कराटे स्पर्धेत वाशिमच्या आलियाचे सुवर्ण यश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४वाशीम :** महाराष्ट्र राज्य कराटे स्पर्धेत अनसिंग येथील अलीया मो. बाबर हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. अकोला येथील वसंत देसाई स्टेडियममध्ये महाराष्ट्र ॲमॅच्युअर कराटे असोसिएशनच्या वतीने नुकतीच ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेचे आयोजन सिंहाण अरुण सारवाण यांनी केले होते. १४ वर्षांखालील वयोगटातील व वजनगटातील कुमीते (फाइट) प्रकारात अलीया हिने सहभाग नोंदवला होता. अत्यंत कौशल्यपूर्ण आणि आत्मविश्वासपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत तिने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

आतापर्यंत अलीया बाबर हिने राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये अनेक सुवर्णपदके पटकावत अनसिंग गावासह वाशीम जिल्हा व महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याची इच्छा तिने व्यक्त केली आहे.

अलियाला अनसिंग (जि. वाशीम) येथील कराटे प्रशिक्षक बालकिसन नवगणकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण मिळत असून, सेंसाई सौरभ बालकिसन नवगणकर (ब्लॅक बेल्ट, तिसरी डॅन) यांचे विशेष मार्गदर्शन तिला लाभत आहे.

१९८८ पासून अनसिंग येथे विशेषतः मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक बालकिसन नवगणकर यांच्या कार्याचे परिसरात विशेष कौतुक होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी आज परिसरात कराटे प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. भविष्यातही कराटे क्षेत्रात मार्गदर्शन करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अलियाच्या या यशाबद्दल गावकऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिने कराटे क्षेत्रात प्रगती करत आपल्या गावाचे व देशाचे नाव जागतिक पातळीवर उज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## चंद्रपूर महापौरपदाच्या वादावर दिल्लीत तोडगा, प्रतिभा धानोरकर गट वरचढ;

### एकमेकांच्या कामात लुडबुड नको, हाकमांडचा आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४चंद्रपूर-** राज्याचं लक्ष लागलेल्या चंद्रपूर महापालिका महापौरपदासाठी अखेर दिल्लीत तोडगा निघाला आहे. यामध्ये खासदार प्रतिभा धानोरकरांच्या गटाला महापौरपद तर विजय वडेट्टीवार गटाला उपमहापौरपद देण्याचा निर्णय झाला. तर जो गट सोबत येईल त्यांना स्थायी समिती सभापतीपद देण्याचा फॉर्म्युला निश्चित करण्यात आला आहे. बहुमतासाठी अजून चार नगरसेवकांची गरज असल्याने त्याची जमावाजमव करण्याची जबाबदारी ही धानोरकरांच्या खांद्यावर टाकण्यात आली आहे.




चंद्रपुरात काँग्रेसच्या सर्वाधिक जागा निवडून आल्या असल्या तरी विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्यामधील वादामुळे महापौरपदाचा तोडगा निघत नव्हता. शेवटी विजय वडेट्टीवारांनी त्यांच्या १८ समर्थक नगरसेवकांसह दिल्ली गाठली.

नवी दिल्लीमध्ये काँग्रेसचे नेते के सी वेणूगोपाल यांच्या निवासस्थानी विजय वडेट्टीवार, खासदार प्रतिभा धानोरकर, सुनिल केदार, खासदार श्यामकुमार बर्वे यांची एक बैठक पार पडली. त्यामध्ये महापौरपदाच्या वादावर तोडगा निघाला.

धानोरकरांच्या गटाला महापौरपद

चंद्रपूरचे महापौरपद हे धानोरकर गटाकडे तर उपमहापौर हे विजय वडेट्टीवार गटाकडे देण्याचं निश्चित झालं. महापालिकेतील गटनेतेपद हे विजय वडेट्टीवार गटाला देण्याच ठरले. तर जो पक्ष काँग्रेसला पाठिंबा देणार त्याला स्थायी समिती सभापतीपद द्यायचं निश्चित करण्यात आलं.

चंद्रपुरात काँग्रेसला बहुमतासाठी अद्याप चार नगरसेवकांची गरज आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडे ६ तर वंचित बहुजन आघाडीकडे दोन नगरसेवक आहेत. त्यामुळे उर्वरित चार नगरसेवकांची जमवाजमव ही प्रतिभा धानोरकरांनी करायची आहे.

**चंद्रपुरातील पक्षीय बलाबल**
**एकूण नगरसेवक ६६**

- काँग्रेस – २७
- काँग्रेस समर्थित जनविकास सेना – ३
- भाजप – २३
- शिवसेना (उद्धव ठाकरे गट) – ६
- वंचित – २
- बसपा – १
- शिवसेना (शिंदे गट) – १
- अपक्ष – २
- एमआयएम – १

एकमेकांच्या मतदारसंघात लुडबुड नको

चंद्रपुरच्या का महापौर पदावरून सुरू असलेल्या वादामुळे दिल्लीत हाय पॉवर शक्तिप्रदर्शन करण्यात आले. त्यावर तोडगा निघाला असला तरी काँग्रेस हायकमांडने काही सूचनाही दिल्या आहेत. यापुढे एकमेकांच्या मतदारसंघामध्ये लुडबुड करू नका अशा सूचना काँग्रेस हायकमांडने धानोरकर आणि वडेट्टीवार यांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दुसरीकडे ठाकरे गटाकडूनही महापौरपदावर दावा केला आहे. आपल्याला काँग्रेस आणि भाजपची दारे खुली असून जो महापौरपदासाठी आपल्याला पाठिंबा देईल त्याच्यासोबत आम्ही जाऊ असं उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने स्पष्ट केलं आहे.

## वरुड परिक्षेत्रात वाघाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती,** अमरावती वनविभागांतर्गत येणाऱ्या वरुड वनपरिक्षेत्रात एक वाघ मृत अवस्थेत आढळल्याची घटना समोर आली आहे. ही घटना वरुडमधील वाई वर्तुळ, पंढरी बीट येथील खंड क्रमांक १०१० मध्ये घडली असून, याबाबतची माहिती प्राप्त झाली आहे.



वाघाच्या मृत्यूची माहिती मिळताच वरुड येथील पशुधन अधिकारी यांना तातडीने घटनास्थळी पाचारण करण्यात आले. प्राथमिक तपासणीनुसार, या वाघाचा मृत्यू साधारणतः १५ दिवसांपूर्वी झाला असावा असा अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. मृत वाघाचे शवविच्छेदन 'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण'च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आले. त्यानंतर, संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळीच वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या कार्यवाही दरम्यान वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी, पशुवैद्यकीय अधिकारी, डॉग स्कॉड, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि मानद वन्यजीव रक्षक उपस्थित होते.

सदर प्रकरणाचा तपास वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार केला जात आहे, अशी माहिती अमरावती वनविभागाचे उपवनसंरक्षक अर्जुन के. आर. यांनी दिली.

## अजित पवार विमान अपघाताची आता 'डीजीसीए'मार्फत होणार चौकशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मुंबई-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी डीजीसीए करणार आहे. चौकशीसाठी 'डीजीसीए'ने एक समिती स्थापन केली आहे. ही समिती आपला प्राथमिक चौकशी अहवाल १५ फेब्रुवारीपर्यंत सादर करणार आहे. अजित पवार यांना विमान पुरवणाऱ्या 'व्हीएसआर व्हेन्चर्स' या कंपनीचे विशेष ऑडिट करण्याचे आदेश डीजीसीएने दिले आहेत.




**प्राथमिक अहवाल १५ फेब्रुवारीपर्यंत अपेक्षित** – या विशेष ऑडिट समितीमध्ये डीजीसीएचे डेप्युटी डायरेक्टर जनरल आर.के. आनंद यांच्या नेतृत्वाखाली डीजीसीएच्या एअर सेफ्टी विभागाचे डेप्युटी डायरेक्टर जनरल पथिक वाघेला, एअरवर्दीनेस विभागाचे डेप्युटी डायरेक्टर जनरल सुशील मलिक, एअर सेफ्टी विभागाचे सहायक संचालक शिव कुमार जदाला आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह अन्य चार अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# मेळघाट आरोग्य सुधारणांसाठी १३६ कोटींची मागणी

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही सरकारकडून ७२ कोटींचीच तरतूद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

मेळघाटमधील आरोग्य सेवांमधील त्रुटींवरून उच्च न्यायालयाने अलीकडेच जिल्हा आरोग्य विभाग आणि राज्य सरकारला फटकारले होते. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्याच्या आरोग्य विभागाने नवीन उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समिती (ड्ढ्ढउ) मार्फत शासनाकडे १३६ कोटी १० लाख रुपयांची मागणी केली होती. मात्र, शासनाने या मागणीच्या तुलनेत ६४ कोटी रुपये कमी, म्हणजेच केवळ ७२ कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे.

जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी (ऊक्रज) कार्यालय आणि जिल्हा शल्य चिकित्सक (उड) यांनी संयुक्तपणे सन २०२६-२७ साठी आरोग्य सेवांचा आराखडा तयार केला होता. यामध्ये जिल्हा परिषदेने ७७ कोटी ५५ लाख ५० हजार रुपयांची मागणी केली होती, तर उर्वरित मागणी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडून करण्यात आली होती. अशा प्रकारे दोन्ही यंत्रणांनी मिळून एकूण १३६ कोटी १० लाख ५५ हजार रुपयांची मागणी डीपीसीकडे सादर केली.

शासनाने जिल्ह्यातील इतर सर्व यंत्रणांच्या मागण्यांचा हवाला देत केवळ ७२ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी याच सरकारने दोन्ही यंत्रणांना




८९.५ कोटी रुपये दिले होते. यावर्षी अधिक उपाययोजना करण्याची गरज असताना, किमान गतवर्षीपेक्षा जास्त निधी मिळेल अशी अपेक्षा होती, परंतु ती फोल ठरली आहे. निधी कपातीमुळे आरोग्य विभाग गोंधळात पडला असून, उपाययोजना कशा कराव्यात असा पेच अधिकाऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

मागणी केलेल्या रकमेतून जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांचे बांधकाम व विस्तारीकरण करायचे होते. तसेच, उर्वरित इमारतींसाठी अग्निसुरक्षा यंत्रणा खरेदी करणे, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरुस्ती करणे, आणि जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयांसाठी औषधे व इतर साधनसामग्री खरेदी करणे अपेक्षित होते.

याशिवाय, नव्याने सुरू झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आयसीयू, एनआयसीयू, बालरोग विभाग आणि कॅज्युल्टी विभाग अद्ययावत करणे आवश्यक आहे. यासाठी वाढीव निधी मिळणे गरजेचे असून, डीपीसीचे अध्यक्ष या नात्याने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे किती अतिरिक्त निधी मिळवून देतात, याकडे संबंधित यंत्रणांचे लक्ष लागले आहे.

# अमरावती विमानतळास 'अजितदादा पवार विमानतळ' नाव देण्याची मागणी

## मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्र्यांना ई-मेलद्वारे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती :** अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर अमरावतीचे बेलोरा विमानतळ लोकार्पित झाले आहे. या विमानतळाच्या उभारणीसाठी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा सकारात्मक सहभाग लाभला होता. अमरावती जिल्ह्यातील जनता त्यांचे हे ऋण कधीही विसरू शकत नाही. त्यामुळे अमरावती विमानतळास स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी अमरावती अखबारचे संपादक ऋषिकेश शर्मा यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापु तसेच केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठविले आहे.

पाठविण्यात आलेल्या निवेदनात ऋषिकेश शर्मा यांनी नमूद केले आहे की, अमरावती विमानतळाच्या उद्घाटनप्रसंगी स्व. अजितदादा पवार स्वतः उपस्थित होते. त्यांच्या कार्यकाळात या महत्त्वाकांक्षी




प्रकल्पाला गती मिळाली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी राज्याच्या विकासासाठी, पायाभूत सुविधांसाठी तसेच जनहिताशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये मोलाची भूमिका बजावली. प्रेस नोटमध्ये पुढे नमूद करण्यात आले आहे की, स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी व दूरदृष्टीचे नेतृत्व गमावले आहे. अमरावती व पश्चिम विदर्भातील जनतेच्या मनात त्यांच्या विषयी विशेष आदर व कृतज्ञतेची भावना आहे. अशा परिस्थितीत अमरावती विमानतळास अजितदादा पवार विमानतळ असे नाव देणे हा त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान ठरेल.ऋषिकेश शर्मा यांनी मुख्यमंत्री व संबंधित केंद्रीय मंत्र्यांना जनभावनांचा आदर करून अमरावती विमानतळाच्या नामकरणासंदर्भातील मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती केली आहे.

# अमरावती महानगरपालिकेतर्फे प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम

**विदर्भ प्रजसत्ताक दि.४अमरावती-** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त व प्लास्टिक नोडल अधिकारी विनोद टांक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी झोन क्रमांक ०१, रामपुरी कॅम्प अंतर्गत येणाऱ्या इतवारा बाजार परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण २२ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक



आस्थापनांमध्ये कापडी व कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रोनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.तपासणीदरम्यान एक आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने संबंधित 'अमर सोडा' या आस्थापनावर रु. ५,०००/- इतका दंड आकारण्यात आला. तसेच डस्टबिन नसल्यामुळे 'इंदौर जिलेबी कॉर्नर' या आस्थापनावर रु. १,०००/- इतका दंड आकारण्यात आला. या कारवाईतून एकूण रु. ६,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला. सदर मोहिमेमध्ये ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डीक्याव, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, निखिल खंगाळे, प्रवीण उसरे, एम.सैय्यद, परीक्षित गोरले, अनिकेत महल्ले, पार्थ हरमकर व रोहित हडाले उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या वतीने नागरिक व व्यापाऱ्यांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळावा व प्रत्येक आस्थापनात ओला व सुका कचऱ्यासाठी डस्टबिन ठेवणे बंधनकारक आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा तिढा सुटेना! आता 'मोसिकॉल'च्या जागेची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-** अमरावती: गेल्या दोन वर्षांपासून सुरू झालेल्या येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (जीएमसी) जागेचा प्रश्न अद्यापही न सुटल्याने या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा पुढील आराखडा कागदावरच अडकला आहे. या पार्श्वभूमीवर शहराच्या मध्यवस्तीत असलेली 'मोसिकॉल'ची (महाराष्ट्र राज्य तेलबिया व्यापार व औद्योगिक महामंडळ) २४ एकर जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अधिग्रहित करावी, अशी मागणी पुढे आली आहे. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख प्रदीप बाजड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रदीप बाजड यांच्याकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. अमरावतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे कामकाज सुरू झाले असले, तरी पायाभूत सुविधा आणि विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा प्रश्न सुटलेला नाही.

जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या रुग्णांना तत्पर सेवा मिळण्यासाठी मध्यवस्तीत जागा असणे अनिवार्य झाले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) आणि जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) ही दोन्ही मोठी रुग्णालये शहराच्या मध्यभागी आहेत. मोसिकॉलची २४ एकर जमीन या दोन्ही रुग्णालयांपासून जवळच आहे. ही जमीन गेल्या अनेक वर्षांपासून पडीक असून ती शासनाच्याच मालकीची आहे. जर ही जागा वैद्यकीय




महाविद्यालयाला मिळाली, तर निवासी डॉक्टर आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ते अत्यंत सोयीचे ठरेल, असा दावा प्रदीप बाजड यांनी निवेदनात केला आहे.

लिलाव प्रक्रिया थांबवण्याची मागणी

सध्या या जागेच्या विक्रीसाठी लिलाव प्रक्रिया प्रस्तावित असल्याची चर्चा आहे. मात्र जनहित लक्षात घेता ही लिलाव प्रक्रिया तत्काळ थांबवून संपूर्ण जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी हस्तांतरीत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शासकीय जमीन खासगी संस्थांना देण्यापेक्षा वैद्यकीय सुविधेसाठी वापरल्यास सामान्यांना त्याचा मोठा फायदा होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वैद्यकीय महाविद्यालयासाठी कोंडेश्वर नजीक आलियाबाद (वडद) येथील ११.२९ हेक्टर जमीन मंजूर झाली आहे. पण, ही जागा शहरापासून १५-२० किलोमीटर लांब असल्याने तेथे रुग्णांना जागे दुरापास्त होणार आहे. त्यामुळे या जागेसंदर्भात तत्कालीन समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत फेरविचार करावा तसेच सोयीची ठरणाऱ्या नागपूर महामार्गालगतच्या जागेचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, अशी मागणी आमदार संजय खोडके यांनी हिवाळी अधिवेशनात केली होती. वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी साधारणपणे ६०० ते ७०० कोटी रुपये लागणार आहेत. मात्र महाविद्यालय हे शहरापासून दूर असल्यास तिथे रुग्णच पोहचू शकणार नसल्याने एवढा मोठा खर्च व्यर्थ जाईल, असे संजय खोडके यांनी सांगितले होते.

# वर्गखोलीच्या स्लॅबचे प्लास्टर कोसळले

## चाकर्दा शाळेतला धक्कादायक प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ धारणी-** धारणी पंचायत समितीच्या हद्दीतील चाकर्दा येथील जिल्हा परिषद शाळेत एक गंभीर व धक्कादायक घटना घडली. नवनिर्मित वर्गखोलीच्या स्लॅबवरील प्लास्टर अचानक कोसळल्याने शाळा परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने त्यावेळी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी सुरू असल्याने सर्व विद्यार्थी वर्गाबाहेर प्रांगणात होते. त्यामुळे संभाव्य मोठा अपघात टळला असून पालक व ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

घटनेनंतर शाळेत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जर ही दुर्घटना वर्ग चालू असताना घडली असती, तर विद्यार्थ्यांना गंभीर दुखापत झाली असती. शिक्षणाचे पवित्र स्थान मानल्या जाणार्या शाळेतच असा निष्काळजीपणा व हलगर्जीपणा समोर येणे अत्यंत चिंताजनक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. माहितीनुसार, चाकर्दा ग्रामपंचायतीमार्फत जिल्हा निधीतून मोठ्या प्रमाणावर खर्च करून ही वर्गखोली उभारण्यात आली होती.



मात्र, बांधकामाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच शंका व्यक्त केल्या जात होत्या.

निकृष्ट दर्जाचा साहित्य वापर आणि योग्य देखरेखीअभावी अवघ्या काही कालावधीतच स्लॅबचे प्लास्टर कोसळल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. संबंधित कंत्राटदारासह कामावर नियंत्रण ठेवणार्या यंत्रणेची भूमिका संशयास्पद असल्याचेही बोलले जात आहे.

या प्रकाराची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ, पालक व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी या घटनेची दखल घेऊन जबाबदार कंत्राटदार व संबंधित अधिकार्यांविरुद्ध कायदेशीर पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मेळघाटातील सर्व शासकीय शाळांच्या इमारतींचे तात्काळ संरचनात्मक परीक्षण (ऑडिट) करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशीही जोरदार मागणी पुढे येत आहे.

# अजितदादांचा दशक्रिया विधी होणार नाही

## भाऊ श्रीनिवास पवार यांची माहिती, कारण सांगितलं

**विदर्भ प्रजसत्ताक दि.४ बारामती-** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातामध्ये निधन झाले. त्यांचे निधन होऊन पाच दिवस उलटले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतरच्या धार्मिक विधींबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.



अजित पवार यांचा 'दशक्रिया विधी' होणार नाही, अशी माहिती अजित पवार यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी दिली. अस्थि विसर्जना दिवशीच सर्व धार्मिक विधी पार पाडले असल्यामुळे आता कोणताही विधी केला जाणार नसल्याची माहिती श्रीनिवास पवार यांनी दिली.अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य शोकसागरात बुडाले होते. दरम्यान, तिसऱ्या दिवशीच सर्व धार्मिक विधी केल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे आता दहावे आणि तेरावे होणार नाही. याबाबत आता अजित पवार यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

दरम्यान, राज्यभरात आता महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीची प्रक्रिया सुरू आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाला फक्त पाच दिवस उलटले आहे. राज्य अजूनही शोकसागरात आहे. यामुळे आता भाजपाने आपल्या कार्यकर्त्यांना महापौर आणि उपमहापौर निवडीनंतर फटाके न फोडण्याचे आणि गुलाल न उधळण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# धारणीच्या जंगलात चौकीदार निघाला चोर

## शेतातून सागवानचे लाकूड जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४धारणी,** पश्चिम मेळघाटातील प्रादेशिक वन विभागाचा परतवाडा विभाग लाकूड तस्करीसाठी प्रसिद्ध आहेतच. आता मात्र धारणी शहरालगतच्या जंगलातील एका शेतात जवळपास २ घन मीटर लाकूड जप्त करण्यात आल्याने चौकीदारच चोर असल्याची चर्चा सुरू झालेली आहे.



प्रादेशिक वन विभागाच्या धारणी व सुसर्दा या वनपरिक्षेत्रात अनेक वेळा अवैध वृक्षतोड करुन लाखो रुपयांच्या सोनेरी सागवानाची तस्करी यापूर्वी झालेली आहे. आता मात्र, अजब-गजब मेळघाटाच्या नावानुरूप एक घटना उजेडात आल्याने एकच खळबळ माजलेली आहे. धारणी शहराजवळच्या बोड जंगलातील एका शेतात लपवून ठेवलेले सागाचे लाकूड रेंजर लियाकत शेख यांनी पकडलेले आहे. पूर्ण लाकूड धारणी आगारात जमा करुन पुढील तपास वनपरिक्षेत्र आधिकारी यांच्या मार्गदर्शनात वर्तुळ अधिकारी पी. डी. वानखडे करत आहेत. या प्रकरणी पूर्ण प्रकरण नोंद करण्यात आल्याची माहिती असून अंदाजे २ घन मीटर सागाचे लाकूड आहे. मागील तीन वर्षात सुसर्दा आणि धारणी रेंजच्या जंगलातून इमारतीसाठी लागणार्या लाकडाची तस्करी मध्य प्रदेशात करण्यात आलेली होती. एकवेळा सुसर्दाच्या अधिकार्यांनी गुन्हा कायम केला होता. मात्र आरोपी व लाकूड आजपर्यंत अप्राप्त आहेत. धारणीच्या जंगलातून अवैध वृक्षतोड करुन मध्य प्रदेशच्या बैतुल जिल्ह्यात तस्करीने सागाचे लाकूड नेले जाते. एका घटनेत बैतुल वन विभागाच्या कारवाईनंतर प्रादेशिक वनविभागाने थातुर-मातूर कारवाई केलेली होती. धारणी व सुसर्दाच्या जंगलात अवैध वृक्ष तोडीसाठी कंपू कार्यरत असल्याची गंभीर माहिती असून प्रत्येक जंगलातील थूट मोजण्याची कारवाई वन विभागाने तात्काळ करावी, अशी मागणी आहे.

# नांदगाव पेठ मध्ये पहिल्यांदा शरीरसौष्ठव स्पर्धेचा महायज्ञ

## नांदगाव पेठ श्री' किताबासाठी जिल्हाभरातील शरीरसौष्ठव पटूमध्ये रंगणार स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ नांदगाव पेठ -** श्री संत गजानन महाराज प्रगट दिनाचे औचित्य साधून नांदगाव पेठ येथे प्रथमच भव्यदिव्य शरीरसौष्ठव (बॉडी बिल्डिंग) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमामुळे गावाच्या क्रीडाक्षेत्रातील इतिहासात नवा अध्याय लिहिला जाणार आहे. अमरावती डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशनच्या मान्यतेने तसेच सप्तरंग क्रीडा व शिक्षण मंडळाच्या पुढाकाराने ही स्पर्धा शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता, छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथील ग्रामपंचायत पटांगणात संपन्न होणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून येणारे शेकडो शरीरसौष्ठवपटू आपली ताकद, काटकपणा व सौष्ठव सादर करणार असून ० ते ६० किलो, ६० ते ६५ किलो, ६५ ते ७० किलो, ७० किलोवरील खुला गट तसेच गाव गट अशा विविध वजनगटांमध्ये स्पर्धा रंगणार आहे.या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असलेली 'नांदगाव पेठ श्री - चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' ही मानाची स्पर्धा असून या किताबासाठी होणारी चुरस पाहणे रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. या प्रतिष्ठेच्या विजेत्यास ७००१ रुपये रोख बक्षीस देण्यात येणार असून,




सौंदर्यपूर्ण सादरीकरण करणाऱ्या शरीरसौष्ठवपटूसाठी बेस्ट पोजर पुरस्कारांतर्गत ५००१ रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील युवकांमध्ये व्यायाम, शिस्त, संयम आणि सुदृढ जीवनशैलीची जाणीव निर्माण करण्याचा या स्पर्धेचा उद्देश असून ही स्पर्धा केवळ शारीरिक ताकदीची नव्हे तर आत्मविश्वास, चिकाटी आणि सातत्याची कसोटी ठरणार आहे. या माध्यमातून नांदगाव पेठ व परिसरातील तरुणांमध्ये फिटनेस संस्कृती अधिक बळकट होईल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे. स्पर्धेच्या नोंदणीला प्रारंभ झाला असून स्पर्धकांनी नोंदणीसाठी फिटनेस एक्सप्रेस जिम, अंबापेठ अमरावती येथे तसेच राजेंद्र तुळे ८०५५०७७२५६,प्रीतम पाटील ९८२२२२४९३७,सुशांत रोडे,७८२०८६१६६०,विशाल शिंदे ९९२११२२२९३,नवीन जयस्वाल ९७६७३२६७३४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी समस्त तरुण, युवक, गावकरी व मित्रपरिवार अहोरात्र परिश्रम घेत आहे.

# रोहित पवारांना सुप्रीम कोर्टाचा झटका, MCA निवडणुकीवरील स्थगिती कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या निवडणुकांवर मुंबई उच्च न्यायालयाने लावलेली स्थगिती उठवण्यास नकार दिला. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने एमसीएवर एक अत्यंत संक्षिप्त पण कठोर निरीक्षण नोंदवले. स्थगिती योग्य आहे. त्यांनी (मुंबई उच्च न्यायालयाने) तुम्हाला मोठा घोटाळा करण्यापासून रोखले, आमच्याकडून आणखी टीका करून घेऊ नका, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. या प्रकरणाची सुनावणी गुणवत्तेच्या आधारावर उच्च न्यायालयात प्रलंबित आहे आणि एमसीए तिथे आपली बाजू मांडू शकते, असे न्यायालयाने नमूद केले.

दरम्यान, ६ जानेवारी रोजी उच्च न्यायालयाने एमसीएच्या सर्वसाधारण सभेत निवडणुकांच्या अगदी आधी मोठ्या संख्येने नवीन सदस्यांना प्रवेश दिल्याने कायदेशीरपणा, निष्पक्षता आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदवत एमसीए सर्वोच्च परिषदेच्या निवडणुकांना स्थगिती दिली होती.

हा अंतरिम आदेश विद्यमान एमसीए अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्यासाठी एक मोठा धक्का होता. उच्च न्यायालयाने नमूद केले की, २३ डिसेंबर २०२५ रोजी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध होण्याच्या अवघ्या दोन महिने आधी एमसीएच्या सर्वसाधारण सभेत सुमारे ४०० नवीन सदस्यांना प्रवेश देण्यात आला होता. माजी भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव, लातूर जिल्हा क्रिकेट



संघटना, अनंत नीळकंठ माटे (एमसीएचे आजीवन सदस्य) आणि शिक्षण प्रसारक मंडळीचे सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे यांनी दाखल केलेल्या याचिकांवर उच्च न्यायालयाने हा आदेश दिला आहे. जाधव यांच्या याचिकेत विशेषतः असा आरोप करण्यात आला होता की, नवीन यादीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे नातेवाईक-ज्यामध्ये त्यांची पत्नी कुंती पवार आणि सासरे सतीश मगर यांचा समावेश आहे-तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती, बारामती ग्रोचे सुभाष गुलवे आणि ३० हून अधिक राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचा समावेश आहे. याचिकेनुसार, ही नावे कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता अचानकपणे जोडण्यात आली होती.


जाधव यांनी आरोप केला की, या यादीत विद्यमान अध्यक्षांच्या जवळच्या नातेवाईकांचा समावेश करून घराणेशाहीला प्रोत्साहन दिले जात आहे. उच्च न्यायालयाने निवडणुकांना स्थगिती दिल्यानंतर, एमसीएने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. एमसीएच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी म्हणाले की, हा मनाई आदेश बेकायदेशीर आहे. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने हे अपील स्वीकारण्यास नकार दिला आणि एमसीएला उच्च न्यायालयातच या प्रकरणावर युक्तिवाद करण्यास सांगितले.

# ७ फेब्रुवारीपासून 'समृद्धी'वर ट्रॅफिक ब्लॉक

## वाशिम-बुलढाणा टप्प्यात ३५ वेळा वाहतूक थांबणार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.४बुलढाणा-** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी एक महत्त्वाची सूचना आहे. महामार्गावर 'हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' अंतर्गत अत्याधुनिक 'गॅन्ट्री' उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी ७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद ठेवली जाणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (चडठऊ) दिलेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरील किमी १७८.९०० ते २९०.४०० या १११ किलोमीटरच्या अंतरात हे काम



चालणार आहे. यामध्ये प्रामुख्याने वाशिम जिल्हा : कारंजा (लाड), मंगरुळपीर, मालेगाव. बुलढाणा जिल्हा : मेहकर तालुक्यांचा समावेश आहे.

**वाहतुकीवर होणारा परिणाम**

गॅन्ट्री उभारणीच्या कामासाठी एकूण ३५ टप्प्यांत वाहतूक रोखली जाईल. प्रत्येक टप्प्यात संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णपणे बंद असेल. काम पूर्ण होताच वाहतूक पुन्हा पूर्ववत केली जाईल. वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड), मंगरुळपीर, या मालेगाव तसेच बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर या चार तालुक्यांतून जाणाऱ्या समृध्दी महामार्गावर ही 'गॅन्ट्री' उभारली जाणार आहे. या कामासाठी संबंधित वाहिनीवरील वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असून, काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक तत्काळ सुरू करण्यात येणार आहे. समृध्दी महामार्गावरून मुंबई व नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या वाहतुक ही ठराविक वेळेत बाधित होणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा व प्रवासाचे नियोजन करूनच मार्गक्रमण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**असे असेल वेळापत्रक**

७ ते २३ फेब्रुवारी दरम्यान मुंबई आणि नागपूर या दोन्ही वाहिन्यांवर विविध ठिकाणी हे ब्लॉक्स घेतले जातील.

वेळ : प्रामुख्याने रात्री १२ ते १ वाजेपर्यंत आणि दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत.

ठिकाणे : किमी १७८.९०० पासून २८३.९०० पर्यंतच्या विविध १९ निश्चित पॉइंट्सवर हे काम चालणार आहे.

**प्रवाशांना आवाहन**

मुंबई किंवा नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांनी या ठराविक वेळेत प्रवास टाळावा किंवा प्रवासाचे योग्य नियोजन करावे. वाहतूक बाधित होणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, प्रवासादरम्यान महामार्ग पोलीस आणि रस्ते विकास महामंडळाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, जेणेकरून सुरक्षितता राखली जाईल.

दि. ७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत विविध तारखांना रात्री १२ ते १ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत, मुंबई व नागपूर वाहिनीवर अनुक्रमे कि.मी. १७८.९०० , १७९.७५०, १८३.७०० , १८५.५००, १९०.४०० , २००.४००, २०५.४०० , २०८.२००, २०८.८५० , २३८.५५०, २४२.६०० , २४५.४००, २५०.५००, २६०.४००, २६४.८०० , २७०.४००, २८०.४०० , २८१.४०० व २८३.९०० या ठिकाणी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.

# दिव्यांग नसताना प्रवासाचा लाभ, बोगस प्रवासी एसटीच्या रडारवर


## अकोटमध्ये वाहकांकडून यूडीआयडी कार्डची पडताळणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अकोट-** बनावट कागदपत्रांच्या आधारे एसटी बसने प्रवास करणारे दिव्यांग प्रवासी आता एसटी महामंडळाच्या रडारवर आले आहेत. दिव्यांग कल्याण विभाग सचिवांच्या सूचनेनुसार एसटी महामंडळाकडून आता मोबाइल ॲपच्या माध्यमातून दिव्यांग प्रवाशांच्या ओळखपत्राची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. अकोटमध्ये एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या दिव्यांग प्रवाशांकडील युडीआयडी कार्डची तपासणी होत आहे.

ओळखपत्र बनावट आढळल्यास वाहकांनी ते जप्त करत संबंधितावर आगार स्तरावर दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापक अरविंद पिसोडे यांनी दिली आहे. बनावट दिव्यांग ओळखपत्र (यूडीआयडी) वापरुन राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकरणात थेट गुन्हा दाखल करून बनावट ओळखपत्र जप्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बनावट दिव्यांग ओळखपत्र प्रकरणानंतर राज्यभर ही कारवाई राबवली जात असून अकोट आगाराने वाहकांना 'यूडीआयडी डिपार्टमेंट ऑफ एम्पॉवरमेंट पीएफडब्ल्यूडी हे मोबाइल अप्लिकेशन डाउनलोड करुन युडीआडी कार्ड तपासणी सरू करण्याच्या सूचना आगार व्यवस्थापक अरविंद पिसोडे यांनी दिल्या आहेत.



एसटी बसने प्रवास करताना पात्र दिव्यांग व्यक्तींनाच सवलतींचा लाभ मिळावा, या सवलतीचा गैरवापर थांबावा, यासाठी यूडीआयडीची तांत्रिक पडताळणीची कठोर अंमलबजावणी अकोट आगाराकडून केली जात आहे. खऱ्या व पात्र दिव्यांग प्रवाशांना सवलतीचा लाभ मिळावा, हा याचा उद्देश असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दिव्यांग सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. त्यामुळे ही पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे व सातत्याने राबवण्याचे नियोजन एसटी प्रशासनाने केले आहे. या तपासणीमुळे सवलतीच्या नावाखाली गैरप्रकार थांबेल. खऱ्या दिव्यांग प्रवाशांना अधिक न्या मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या मोहिमेमुळे बनावट दिव्यांग ओळखपत्र घेऊन फिरणाऱ्या प्रवाशांचे धाबे दणाणले आहे. या पमध्ये प्रवाशांचा यूडीआयडी क्रमांक व जन्मतारीख नोंदवून ओळखपत्राची वैधता, फोटो तपशील आणि प्रत्यक्ष लाभार्थात सुसंगती आहे की, नाही, याची खातरजमा केली जाणार आहे. खऱ्या व पात्र दिव्यांगांनाच या सवलतीचा लाभ मिळावा, हा कारवाई मागचा मुख्य उद्देश आहे. मोबाइलमध्ये ॲप डाउनलोड केल्यानंतर यूडीआयडी कार्ड स्कॅन करताना अडचणी येत आहेत. तर कधी नेटवर्कअभावी इतर प्रवाशांच्या तिकीट काढतांना विलंब होत आहे, अशी गाऱ्हाणी काही वाहकांनी मांडली. या मार्गावर सर्वाधिक प्रवासी अमरावती, अकोला मार्गावर युडीआयडी कार्ड दाखवून प्रवास करणारे प्रवासी अधिक असल्याची माहिती आहे.

# राजकारणात काहीही होऊ शकते

# महापौर पदाच्या निवडणुकीत पत्ते उघडू

## इम्तियाज जलील यांचे सूचक विधान


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४छत्रपती संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत ५७ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमतासाठी अवघ्या एका जागेची कमतरता भासत असल्याने सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे ३३ जागा जिंकून एमआयएमने दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष म्हणून मुसंडी मारली आहे. या पार्श्वभूमीवर, भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी इतर सर्व पक्ष एकत्र येणार का आणि एमआयएम नेमकी काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, १० तारखेला होणाऱ्या महापौर निवडणुकीबाबत राजकारणात काहीही होऊ शकते, असे सूचक विधान करत इम्तियाज जलील यांनी सस्पेन्स अधिकच वाढवला आहे. तसेच १० तारखेला पत्ते उघडू, असेही त्यांनी म्हटले आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीसाठी एमआयएमने आपला उमेदवार रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय चुरस वाढली असून, भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी एमआयएम चक्क शिवसेनेसोबतही जाण्याचा विचार करत असल्याचे संकेत इम्तियाज जलील यांनी दिले आहेत. १० तारखेला होणाऱ्या मतदानावेळी काहीतरी धक्कादायक घडण्याची शक्यता वर्तवत, जलील यांनी सध्या विविध पक्षांशी वाटाघाटी सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे भाजपला शह देण्यासाठी दोन्ही शिवसेना एमआयएमला पाठिंबा देऊन नवीन राजकीय समीकरण उभे करणार का, याबाबतचा सस्पेन्स आता अधिकच गडद झाला आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ११५ जागांपैकी बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ५८ च्या आकड्यापासून भाजप (५७ जागा) अवघ्या एका पाऊल अंतरावर असून, त्यांना सत्तेपासून रोखण्यासाठी एमआयएम (३३), शिंदे यांची शिवसेना (१३), ठाकरे यांची शिवसेना



(६), वंचित (४), काँग्रेस (१) आणि राष्ट्रवादी शरद पवार गट (१) या सर्व विजातीय पक्षांना एकत्र येऊन ५८ ही 'मॅजिक फिगर' गाठावी लागेल.

# ग्रामपंचायत ब्राह्मणवाडा गोविंदपुरच्या वतीने अधिकारांचा गैरवापर

## बिरसा ब्रिगेडचे मनिष धुर्वे यांचा ग्रामपंचायत प्रशासनावर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती** ब्राह्मणवाडा गोविंदपुर येथील ग्रामपंचायत प्रशासनाने आपल्या अधिकारांचा गैरवापर करीत शासकीय गायराण जमीन खाजगी कंपनीच्या घशात घालून ग्रामस्थांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप बिरसा ब्रिगेडचे कार्यकर्ते मनिष धुर्वे यांनी केला आहे. ग्रामपंचायत ब्राह्मणवाडा गोविंदपुर सध्या भ्रष्टाचाराचा अड्डा बनले असून याप्रकरणी प्रशासनाकडून जाणीवपूर्वक नियमांना डावलले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ग्रामपंचायतीच्या दिनांक २३ ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या मासिक सभेत घेतलेल्या अनधिकृत ठरावाद्वारे मौजे ब्राह्मणवाडा गोविंदपुर येथील गट क्रमांक २४७ मधील शासकीय गायराण जमीन, जी गावातील तरुणांसाठी नियोजित क्रीडा मैदानासाठी आरक्षित होती, ती सीएमईएस ज्युपिटर प्रायव्हेट लिमिटेड या खाजगी कंपनीला टॉवर उभारण्यासाठी देण्यात आल्याचे उघड झाले आहे. हा ठराव महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १२ तसेच ७ सप्टेंबर २०१० रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे उल्लंघन करून मंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे. या ठरावाच्या आधारे संबंधित कंपनीने पुढील कामकाज सुरू केले असल्याचेही सांगण्यात आले. तसेच दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामसभेत कोणतीही चर्चा न करता, मौजे दस्तापूर व ब्राह्मणवाडा गोविंदपुर येथील खाजगी क्षेत्रात सौर ऊर्जा



प्रकल्प उभारण्यासाठी सीएमएस ज्युपिटर प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांना बेकायदेशीररित्या ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी संबंधित विभागांची पूर्वपरवानगी न घेता, जमीन भाडेतत्त्वावर देण्यापूर्वी आवश्यक असलेले भाडे, कालावधी, अटी व शर्ती, जमिनीचा तपशील आदी बाबी ठरावात नमूद करण्यात आल्या नाहीत. तसेच कंपनीकडून लीज करार व संबंधित कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात जमा न करताच कारवाई करण्यात आली असल्याचे मनिष धुर्वे यांनी सांगितले. मॉडेल लँड लीजिंग कायद्यानुसार शासनाच्या सुधारित धोरणानुसार प्रति एकरी ५० हजार रुपये प्रतिवर्ष मोबदला अपेक्षित असताना, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना केवळ २८ ते ३० हजार रुपये प्रति एकर इतकाच मोबदला देण्यात येत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ही बाब शेतकऱ्यांची मोठी फसवणूक असून, या अन्यायाला ग्रामपंचायत प्रशासन अभय व बळ देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या सर्व प्रकाराच्या निषेधार्थ शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजून ग्रामपंचायत कार्यालय, ब्राह्मणवाडा गोविंदपुर समोर डफळी वाजवत आंदोलन तसेच 'बेशरमाचे झाड' लावून निषेध करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या आंदोलनात गावातील तरुण, युवक व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बिरसा ब्रिगेडचे मनिष धुर्वे यांनी केले आहे.

# अकोल्यात अश्लील व्हिडिओद्वारे ब्लॅकमेलिंग; विवाहितेवर अत्याचार

### धर्मांतराचाही आग्रह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अकोला** अकोला येथील गांधी रोडवरील सिटी कोतवाली पोलिस ठाणे अंतर्गत येणाऱ्या खंडेलवाल ज्वेलर्स शेजारील असलेल्या 'परी बिंदी घर'' नामक सौंदर्य प्रसाधन दुकानाचा संचालक व त्याच्या साथीदारांकडून डाबकीरोड भागातील एका विवाहितेला अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार बलात्कार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच महिलेला धर्मांतर करण्याचा दबाव आणल्याचा प्रकारही उघडकीस आला.

याबाबत सिटी कोतवाली पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील तीन आरोपींना अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी रुग्णालयात उपचारार्थ भरती झाल्याने त्याची अटक तूर्त टळली आहे. 'परी बिंदी घर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कॉस्मेटिक दुकानात खरेदीसाठी येणाऱ्या महिलांना आमिष दाखवून जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार आणि मानसिक शोषण केल्याचा गंभीर आरोपसमोर आला आहे.

डाबकी रोड परिसरातील २९ वर्षीय विवाहितेच्या फिर्यादीनुसार, दुकान मालक रहेमान उर्फ मोहंमद मुस्तफा मोहमंज सलीम तेली, त्याचा साथीदार चंदू राजू वानखेडे, इम्रान गॅरेजवाला आणखी एक जण अशा चौघांविरुद्ध ३ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंदवला आहे. दुकानमालक रहेमान उर्फ मोहंमद मुस्तफा हा प्रकृती बिघडल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल झाल्याने तो वगळता इतर तिघांना सिटी कोतवाली पोलिसांनी अटक केली. फिर्यादी महिलेवर ट्रान्स्पोर्ट गल्लीतआरोपीचा मित्र सुभान यांच्या टू बीएचके फ्लॅटमध्ये हा अत्याचाराचा प्रकार घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

**ओळख वाढवून जाळ्यात ओढायचा**

माहितीनुसार, आरोपी सुरुवातीला दुकानात आलेल्या महिलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधत. विश्वास संपादन केल्यानंतर 'नवीन कॉस्मेटिक साहित्य आले आहे' किंवा 'ऑर्डर पाठवायची आहे' या बहाण्याने महिलांचे मोबाइल नंबर घ्यायचा. त्यानंतर सतत फोन, मेसेजकरून त्यांना पुन्हा दुकानात येण्यास प्रवृत्त केले जात होते. काही वेळा दुकानात इतर कोणी नसल्याची संधीसाधून असभ्य वर्तन करण्याचा प्रयत्न झाल्याचेही तक्रारीत नमूद आहे. काही महिलांनी संशय येताच दुकानात जाणे टाळले, मात्र आधी दिलेल्या मोबाइल नंबरच्या आधारे त्यांच्यावर मानसिक दबाव टाकायचा.

**गुपचूप केलेले चित्रीकरण व्हायरल करायची धमकी** महिलांना दुकानात बोलावून गुपचूप व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले. हे व्हिडिओ दाखवून 'सोशल मीडियावर व्हायरल करू' अशी धमकी देत धाक दाखवण्यात आला. काही प्रकरणांमध्ये पीडित महिलांना प्रचंड मानसिक तणावाखाली ठेवून त्यांच्या इच्छेविरुद्ध कृत्ये करण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. अशाप्रकारे व्हिडिओचा वापर करून महिलांचे सातत्याने शोषण करण्यात येत होते, असे तक्रारीत म्हटले आहे.

# लाडकी बहीण योजनेला अजित पवारांचे नाव द्यावे

## अमोल मिटकरींची मागणी;पंकजा मुंडे म्हणतात मुख्यमंत्री निर्णय घेतील



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४बीड-** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनानंतर राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना लाडकी बहीण योजनेला अजित पवारांचे नाव देण्याची मागणी केली जात आहे. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी ही मागणी केली आहे. यावर भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांनी देखील सकारात्मक प्रतिक्रिया दिल्याचे पाहायला मिळत आहे.लाडकी बहीण योजनेला अजित पवारांचे नाव देण्यात यावे अशी मागणी केली जात असून यावर मंत्री पंकजा मुंडे यांना विचारले असता, या योजनेला अजितदादा पवारांचे नाव देण्याबाबत मागणीवर मुख्यमंत्री निर्णय घेतील. त्याला आमचे समर्थन राहील, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजित सभेनंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.पंकजा मुंडे यांच्या देखील हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला होता. यावर त्यांनी सांगितले की, हे मला सकाळी सांगण्यात आले. काय बिघाड झाला माहीत नाही. मी दौऱ्यावर निघणार होते त्यावेळी मला कळवण्यात आले की हेलिकॉप्टर उडू शकणार नाही. तसेच अजित पवारांच्या मृत्यूवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शंका उपस्थित केली होती.

# दहावी, बारावी परीक्षांसाठी 'कॉपीमुक्त अभियान'



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हास्तरीय दक्षता समितीची सभा पार पडली. या सभेत या परीक्षा निकोप आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने दहावी आणि बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुघल, योजना शिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे आदी उपस्थित होते. दहावी आणि बारावीच्या परीक्षा ह्या दि. १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आल्या आहेत. दहावीच्या परीक्षेला ३८,५३१ विद्यार्थी १८७ केंद्रांवरून परीक्षा देणार आहेत. बारावीसाठी ३५,९३४ विद्यार्थी १३७ केंद्रांवरून परीक्षा देतील. परीक्षेच्या कामकाजासाठी एकूण २२ केंद्रे स्थापित करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रावर गैरप्रकार रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात पोलीस अधिनियम ३७ (१) (३) लागू करण्यात आला आहे. केंद्राच्या ५०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स दुकाने परीक्षा कालावधीत बंद राहतील. सर्व केंद्रांवर हत्यारी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. मंडळाने जाहीर केलेल्या 'उपद्रवी' केंद्रांवर विशेष प्रभावी यंत्रणा राबविली जाईल. परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वीज वितरण कंपनीला विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, विद्यार्थ्यांनी केंद्रावर वेळेत पोहोचावे यासाठी परिवहन विभागाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# रेती तस्करी करणाऱ्यांवर कार्यवाही केली अन अंगलट आली

## तलाठी विरोधात तक्रार, पैशाची मागणी व गन दाखवल्याचा धक्कादायक आरोप : तलाठी म्हणतात खोटे आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ चांदुर बाजार**



चांदुर बाजार तालुक्यातील दिनांक ३१ जानेवारी रोजी कोतगावंडी येथील नदी पात्रात रेती तस्करी करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली होती रेती तस्कर चेतन तळकीत व रोशन तळकीत यांच्या विरोधात आसेगाव पोलीस स्टेशन येथे तलाठी मोहन पाखरे यांच्या तक्रारीवरून दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे मात्र महसूल अधिकारी यांनी केलेली कार्यवाही तलाठी मोहन पाखरे व तलाठी विपीन ठाकरे यांच्या अंगलट आल्याचा प्रकार समोर येत आहे आरोपी रोशन तळकीत व चेतन तळकीत यांच्या आई ने तलाठी विरोधात तक्रार दाखल केली आहे माहिती नुसार रेती तस्कर चेतन व रोशन यांच्या कडे रेती वाहतुकीचा वैध परवाना असतांना तलाठी पाखरे यांनी माझ्या मुलांची खोटी तक्रार दाखल केल्याचा आरोप आरोपीतांच्या आई ने केला आहे दिनांक ३१ जानेवारी रोजी तालुक्यातील कोतगावंडी येथील नदी पात्रात रेती तस्कर रेती भरण्यासाठी ट्रक्टर वाहन घेऊन जात असल्याची माहिती तलाठी विपीन ठाकरे व मोहन पाखरे यांना मिळाली असता तलाठी यांनी कार्यवाही करण्यासाठी धाव घेतली रेती तस्कर चेतन व रोशन ला याची माहिती मिळताच ट्रक्टर वाहन जागेवर सोडून पसार झाल्याच बोलल्या जात आहे त्यानंतर तलाठी यांनी दिलेल्या माहितीनुसार अज्ञात दोन व्यक्ती घटनास्थळी आले असता आम्हाला धमकावून ट्रॅक्टर पळून घेऊन गेल्याच तलाठी यांच म्हणणे आहे रेती तस्कर चेतन व रोशन यांच्या आई ने सबंधित तलाठी विरोधात खोटी तक्रार दाखल केल्याचा आरोप केले आहे तर तलाठी मोहन पाखरे माझ्या मुलांना वारंवार पैशाची मागणी करतात तलाठी ठाकरे व तहसीलदार यांच्या साठी सुद्धा पैशाची मागणी करतात याचा पुरावा असल्याचही चेतन व रोशन च्या आईने आरोप केला आहे तर तलाठी विपीन ठाकरे यांनी म्हटले की माझ्या गाडी मध्ये गन असते तुला उडवून टाकेल असाही धक्कादायक आरोप आरोपीतांच्या आई ने केला असून जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी व तहसीलदार मनोज सोनारकर यांना तक्रार देऊन केला आहे व सदर प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही ची मागणी रेती तस्कर चेतन व रोषणच्या आई ने केली आहे तर आम्ही संबंधित तलाठी यांना संपर्क केला असता तलाठी यांनी सर्व आरोप चुकीचे आहे असे म्हटले आहे.

# शुक्रवारी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर

## 'आयएफएस', 'आयपीएस' अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या आणि अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांसाठी जिल्हा प्रशासनातर्फे शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनात विशेष स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नुकतेच यश संपादन केलेले दोन अधिकारी विद्यार्थ्यांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. २०२२ बॅचचे भारतीय वन सेवेत निवड झालेले प्रांजल चोपडे आणि २०२४ बॅचचे भारतीय पोलिस सेवेत निवड झालेले सागर भामरे मार्गदर्शन करणार आहेत. दोन्ही मार्गदर्शक अभियांत्रिकी पार्श्वभूमीचे असून त्यांनी अत्यंत कमी वेळात यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेत यश मिळवले आहे. त्यामुळे त्यांचा अनुभव नवोदित विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहे. जिल्हा प्रशासनाने हे शिबिर पूर्णतः विनामूल्य ठेवले असून, परीक्षेची रणनीती, अभ्यासाचे नियोजन आणि मुलाखतीची तयारी या विषयांवर शिबीरात सखोल चर्चा केली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांना सर्व सुविधा देणार-जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

निम्न पेढी प्रकल्पात पाच गावांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. या मान्सून हंगामात प्रकल्पात पाणी साठविण्यास सुरूवात होणार आहे. त्यामुळे या गावातील स्थलांतरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित करण्यात येणाऱ्या ठिकाणी सर्व सुविधा देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. निम्न पेढी प्रकल्पातील पुनर्वसनाबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास यांच्यासह बाधित पाचही गावांचे सरपंच आणि सिंचन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. केंद्र शासनाच्या प्राधान्यक्रमातील निम्न पेढी प्रकल्पात हातुर्णा, गोपगव्हाण, कुंड खुर्द, अळणगाव, कुंड सर्जापूर ही पाच गावे बाधित होणार आहे. यासाठी या गावातील रहिवाशांचे स्थलांतर करण्यावर भर देण्यात येणार आहे. सध्यास्थितीमध्ये अळणगाव येथे ७९ आणि कुंड सर्जापूर येथे ७२ नागरीक वास्तव्यास आहेत. त्यामुळे या नागरिकांच्या स्थलांतरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. पुनर्वसित गावात सहमती देऊन स्थलांतरीत झालेल्यांना प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत गावातील नागरिकांना स्थलांतरणासाठी भत्ता, घरकुल मंजूर करण्यात आले आहे. पुनर्वसित गावात नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या पावसाळ्यात प्रकल्पामध्ये पाणी साठणार असल्याने जुन्या गावातील नागरिक बाधित होणार आहे. यामुळे बाधित झाल्यानंतर त्यांचा बचाव करावा लागू नये, यासाठी पूर्व तयारी म्हणून आतापासून त्यांच्या स्थलांतरणासाठी प्रयत्न करावा. हातुर्णा येथे अंगणवाडीचे काम सुरू करण्यात आले आहे. गोपगव्हाण येथील पाणी पुरवठ्याची विजेची व्यवस्था सुरळीत राहावी, यासासाठी प्रयत्न करावेत. अळणगाव येथील स्मशानभूमीवरील अतिक्रमण काढण्यात यावे. कुंड सर्जापूर प्रार्थनास्थळांसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# पत्रकारांसाठी गुरूवारी विशेष मोफत आरोग्य शिबिर : आयुष्मान कार्ड काढण्याची सुविधा

## पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती**



पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्यांसाठी अमरावती जिल्हा पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात होणार आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकार, प्रसारमाध्यम कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी शिबिर पूर्णतः मोफत असणार आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्यांना विविध तपासण्यांची सुविधा एकाच छताखाली मिळणार आहे. आरोग्यविषयक चाचण्यांमध्ये संपूर्ण रक्त तपासणीसाठी लिपीड टेस्ट, फुल बॉडी चेकअप, नेत्र तपासणी आणि दंत चिकित्सा यांचा समावेश आहे. याठिकाणी केवळ तपासणीच नाही, तर तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्याबाबत मार्गदर्शनही केले जाणार आहे. यासोबतच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिबिरात 'आयुष्मान कार्ड' काढण्याची विशेष सोय करण्यात आली आहे. यासाठी पत्रकारांनी आपले रेशन कार्ड, आधार कार्ड आणि आधारशी लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पत्रकारांनी आपल्या कुटुंबासह याचा लाभ घ्यावा, तसेच अधिक माहितीसाठी ९०२८६५५५५९, ९८२२४९६९७२ किंवा ९८८११०२०८० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पालकमंत्री कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# तणावमुक्त जीवनासाठी योग कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्य जपण्यासाठी स्थानिक विद्याभारती महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागातर्फे 'मानसिक आरोग्यासाठी योग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा दि. ३० जानेवारी २०२६ रोजी यशस्वीपणे पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर यांच्या हस्ते झाले. योगतज्ज्ञ डॉ. वंदना पराते यांनी योगासन, प्राणायाम व ध्यानाच्या माध्यमातून तणाव व्यवस्थापन, एकाग्रता व सकारात्मक विचारसरणीबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

# शहीद भगतसिंह बाल-उद्यानाचा पेच सोडवा

## नगरसेवक चंदू खेडकर यांचे आयुक्तांना निवेदन
## अन्यथा पहिल्या आमसभेत अनुपस्थित राहण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**



शहीद भगतसिंह बाल-उद्यानाचा पेच सोडवा, अशी मागणी नगरसेवक चंदू खेडकर यांनी आयुक्तांना निवेदनाद्धारे केली आहे. अन्यथा पहिल्या आमसभेत अनुपस्थित राहू, असा इशारादेखील यावेळी देण्यात आला.२३ मार्च १९७२ साली शहीद भगतसिंह यांचे बंधू कुलबीरसिह यांच्या हस्ते मांगीलाल प्लॉट परिसरात शहीद भगतसिंह बालोद्यानाचा शिलाण्यास करण्यात आला होता. याला ५५ वर्षे उलटून गेली असताना या बालोद्यानाला साधी वीटदेखील प्रशासनाने रचण्याचा प्रयत्न केला नाही. २३ मार्च २०२६ पूर्वी हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यावर निर्णय करावा.

अन्यथा आमसभेचा आम्ही त्याग केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा नगरसेवक चंदू खेडकर यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून दिला. तसेच प्रभागक्रमांक १ मधील विविध समस्यासोडविण्यात मनपा प्रशासनाने तत्काळ भूमिका घ्यावी, शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन आरोग्य व स्वच्छता विभाग, सफाई कामगार, कर्मचारी, अधिकारी यांच्यात वाढ करण्यात यावी, शेगाव-रहाटगाव परिसर भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण आहे. बहुतांश भागात अजूनपर्यंत सुद्धा कचरा गाडी व सफाई कामगार पोहोचत नाही. म्हणून मनुष्यबळ वाढविण्याची नितांत गरज असल्याचे नगरसेवक चंदू खेडकर यांनी मनपा अतिरिक्त आयुक्त यांना सांगितले.प्रभागातील नागरिकांच्या सोयीने कचरा पेटी व कचरा संकलन रिक्षा मंजूर करणे, हातपंप दुरुस्ती करणे, आरोग्य व स्वच्छता संदर्भात मनुष्यबळ वाढवणे, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतींना उजाळा देणे, पथदिव्यांची संख्या वाढवणे, अशा अनेक मुद्यांवर नगरसेवक चंदू खेडकर यांनी आयुक्तांशी चर्चा केली.

# जोहरीपुरा परिसरातील जीवघेणा रस्ता नागरिकांसाठी ठरत आहे संकट

## नाली बांधकाम न झाल्यास नगर परिषदेला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अचलपूर**



अचलपूर नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १३ अंतर्गत येणाऱ्या जोहरीपुरा परिसरातील सार्वजनिक रस्त्यावर नालीचे बांधकाम न झाल्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. असलम बेग (बांधकाम ठेकेदार) यांच्या घरालगतून जाणारा हा रस्ता सध्या अपघातांचे केंद्र बनला असून, तरीही नगर परिषद प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.या गंभीर समस्येबाबत सामाजिक कार्यकर्ते असलम बेग, अकबर बेग आणि बाबू भाई इक्बाल खान यांनी नगर परिषदेकडे तात्काळ नाली व ढाप्याच्या बांधकामाची मागणी केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की या रस्त्यावरून दररोज शाळकरी लहान मुले, महिला व वृद्ध नागरिक ये-जा करतात. नाली नसल्यामुळे अनेक वेळा नागरिक घसरून पडत असून जखमी होत आहेत.नागरिकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की भविष्यात या रस्त्यावर कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नगर परिषद प्रशासनाची राहील. परिसरातील नागरिकांमध्ये या दुर्लक्षाबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.स्थानिक नागरिकांनी आरोप केला की नगर परिषद दरवर्षी विकास कामांचे ठेके मंजूर करत असतानाही, जोहरीपुरासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित भागात आजपर्यंत कोणतेही ठोस काम करण्यात आलेले नाही. यामुळे नगर परिषदेच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.नागरिकांनी मागणी केली आहे की जर लवकरात लवकर नाली व ढापा बांधकाम सुरू केले नाही, तर नगर परिषद कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा मार्ग स्वीकारावा लागेल. आता या गंभीर समस्येकडे नगर परिषद प्रशासन किती काळ डोळेझाक करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेतकरी साहित्य संमेलन आता थंड हवेच्या गावी, हवशा गवश्यांनी येवू नये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४वर्धा**




शेतकरी हा एक स्वतंत्र विषय. त्याचे प्रतिबिंब प्रचलित साहित्य संमेलनात कधीच उमटले नाही, अशी खंत शेतकरी नेते व्यक्त करतात. समाजातील हा एक मोठा आधार असलेल्या शेतकऱ्यांचे वास्तव पुढे आले पाहिजे म्हणून शेतकरी साहित्य संमेलन ही संकल्पना पुढे आली आणि ती यशस्वी पण ठरली. विविध ठिकाणी १३ अशी संमेलने भरली. आता १४ वे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन महाबळेश्वर येथे आयोजित होणार आहे.

दि. २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, प्रतापगड परीसर, महाबळेश्वर, जि. सातारा येथे दोन दिवसीय १४ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

लातूर येथील ज्येष्ठ शेतीसाहित्य अभ्यासक तथा समीक्षक मा. प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कल्पनाविश्वात रमणार्या आभासी शेतीसाहित्याची शेतीमधल्या प्रत्यक्ष उद्यमीतेच्या वास्तवाशी नाळ जोडण्यासाठी, सांप्रत शेती व्यवसायाला जखडणाऱ्या मानवनिर्मित बेड्यांची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या दाहक समस्यांची मराठी साहित्यविश्वाला जाणीव करून देण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र, अनर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाविषयीच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी, मराठी साहित्य-सारस्वतांची कृषि उद्योगीजगतासोबत सांगड घालून त्यांना कर्तव्यपूर्तीसाठी प्रेरित करण्यासाठी आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवून शेतकर्याच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणण्याइतपत शक्तिशाली सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न म्हणून हे संमेलन होत असते, अशी भूमिका कार्याध्यक्ष गंगाधर मुटे मांडतात.दि. २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, प्रतापगड परीसर, महाबळेश्वर, जि. सातारा येथे दोन दिवसीय १४ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

संमेलनाच्या आयोजनाकरिता विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून दिलीप भोयर (अमरावती) प्रतिभा काळे, सचिव, शेती अर्थ प्रबोधिनी (वर्धा), राजेंद्र फंड (अहिल्यानगर). विनोद काळे, शिवम मुटे (वर्धा) गणेश मुटे (वर्धा), सारंग दरणे, विवेक मुटे (वर्धा) यांची निवड करण्यात आलेली आहे. मागील काही वर्षापासून शेतकरी आत्महत्यांनी विक्राळरूप धारण केले.कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ अशा अस्मानी संकटामुळे उत्पादनात येणारी प्रचंड घट, शेतमालाच्या पडत्या बाजारभावामुळे व वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे डबघाईस आलेले शेतीचे अर्थशास्त्र, मागील पाच वर्षांपासून सततची नापिकी, विजेचे बिल देखीलभरण्याची शेतकऱ्यांची ऐपत उरलेली नाही. निर्विकारपणे शेतीव्यवसायाकडे बघण्याची शासकीय व प्रशासकीय यंत्रणेची मानसिकता तयार झाली आहे.त्यामुळे प्रसारमाध्यमे वगळता अन्य कोणत्याही आघाडीवर याविषयीचा फ़ारसा उहापोह होतांना दिसत नाही. राजकीय आणि शासकीय आघाड्यावर शेतीला आधार देणाऱ्या उपाययोजना शोधण्याऐवजी शेतकर्यांना थातुर-मातुर अनुदानाच्या योजनांचे गाजर दाखवून बोळवण केल्या जात आहे.

# मेळघाटच्या पर्यटन विकासाचा आराखडा तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती :**




मेळघाटच्या हिरव्यागारदऱ्या-खोऱ्या, दाट जंगल आणि निसर्ग सौंदर्य अनुभवण्यासाठी देशभरातून पर्यटक येतात. मात्र, आता हा अनुभव केवळ पाहण्यापुरता मर्यादित न ठेवता, निसर्गाशी थेट संवाद साधण्याचा होणार आहे. मेळघाट पर्यटनाचा त्याच पद्धतीने लवकरच सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे. त्यासाठी आराखडाही तयार करण्यात आला आहे.मेळघाट ॲडव्हेंचर क्लबच्या वतीने याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात सादरीकरण करण्यात आले. या बैठकीतमेळघाटातील पर्यटन विकासाचा आराखडा मांडण्यात आला. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी आशिष येरेकर म्हणाले, विदर्भातील वनपर्यटनामध्ये मेळघाट हा अत्यंत महत्त्वाचा आणि नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध पर्याय आहे. येथे पर्यटनस्थळांच्या विकासासोबतच जंगल भ्रमंती, ट्रेकिंग, ट्रेल्स आणि साहसी पर्यटनाचे पर्याय उपलब्ध करून दिल्यास पर्यटकांचा मुक्काम वाढेल. पर्यटकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत वन विभागाने ट्रेकिंगसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित मार्ग निश्चित करावेत. आवश्यक ठिकाणी स्वतंत्र प्रवेशद्वार उभारण्याचाही विचार करण्यात येणार आहे.

# विकासकामांना ‘युनिक आयडी’ बंधनकारक

अरुण जोशी

## जिल्ह्यात बोगसगिरीला बसणार चाप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

विकासकामांमध्ये पारदर्शकता आणून सरकारी निधीचा अपव्यय टाळण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आता प्रत्येक शासकीय विकासकामाला ‘युनिक आयडी’ देणे बंधनकारक करण्यात आले आहे. रस्ते, पाणी व्यवस्थापन, ऊर्जा तसेच शहरी व ग्रामीण विकासकामांमध्ये होणारी बोगसगिरी या निर्णयामुळे थांबणार असून, जिल्ह्यासह राज्याच्या तिजोरीतील कोट्यवधी रुपयांची बचत होणार असल्याचे सांगितले जात आहे.शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ एक स्वतंत्र ओळख क्रमांक, म्हणजेच ‘युनिक आयडी’ दिला जाणार आहे. हा क्रमांक असल्याशिवाय संबंधित कामाचे देयक अदा करता येणार नाही. त्यामुळे कामांच्या नोंदी अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि एकसंध स्वरूपात उपलब्ध राहणार आहेत.विशेषतः मेळघाट सारख्या दुर्गम भागात अनेकदा कामांची प्रत्यक्ष तपासणी होत नसल्याचा गैरफायदा घेत, आधीच पूर्ण झालेल्या कामांसाठी पुन्हा निविदा काढून निधी उचलल्याचे प्रकार यापूर्वी उघडकीस आले आहेत. युनिक आयडीमुळे एखाद्या ठिकाणी पूर्वीच काम झाले असल्याची नोंद प्रणालीत स्पष्टपणे दिसणार असल्याने अशा प्रकारच्या गैरव्यवहारांना आळा बसणार आहे.युनिक आयडी म्हणजे नेमके काय, याबाबत सांगायचे झाल्यास, जसे प्रत्येक नागरिकाची ओळख आधार कार्डमुळे पटते, तसेच प्रत्येक विकासकामाची ओळख या क्रमांकामुळे पटणार आहे. या युनिक आयडीशी संबंधित कामाचे स्वरूप, संबंधित विभाग, मंजूर निधी, कंत्राटदाराचे नाव, कामाचे अचूक ठिकाण आणि जिओ टॅगिंगद्वारे स्थानाची माहिती डिजिटल स्वरूपात जोडलेली राहणार आहे.अनेकदा एकाच रस्त्यासाठी जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा नगरपालिका वेगवेगळ्या नावाखाली निधी उचलतात. आता जिओ टॅगिंग आणि युनिक आयडीमुळे त्याच ठिकाणी दुसरे काम दाखवण्याचा प्रयत्न केल्यास प्रणाली लगेचच जुन्या कामाची माहिती दर्शवेल. त्यामुळे बोगस बिले काढणाऱ्या कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहेत.कार्यपद्धतीनुसार संबंधित विभागाने प्रथम कामाचा प्रस्ताव प्रणालीत अपलोड करावा लागेल. त्यानंतर प्रणाली आपोआप युनिक कोड तयार करेल. काम सुरू करण्यापूर्वी, काम सुरू असताना आणि काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्रे अपलोड करणे बंधनकारक राहणार आहे. ही माहिती पूर्ण न झाल्यास लेखा विभागाकडून देयक प्रलंबित ठेवले जाईल.विशेष बाब म्हणजे हा निर्णय केवळ नवीन कामांपुरता मर्यादित नसून, गेल्या पाच वर्षांत झालेल्या सर्व विकासकामांनाही युनिक आयडी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे जुन्या कामांची सद्यस्थिती आणि त्यावर झालेला खर्च प्रशासनाच्या स्पष्ट नजरेसमोर राहणार आहे.

# चिखलदऱ्यात बिबट्याचा मुक्त संचार
## विश्रामपूर परिसरात भीतीचे वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ चिखलदरा**

अमरावती जिल्ह्यातील निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदरा येथील विश्रामपूर परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्राम भवनाच्या परिसरात बिबट्या फिरताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला असून, हा प्रकार ३ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ११.४० वाजताच्या सुमारास घडला.सीसीटीव्ही फुटेजनुसार, भूक भागवण्यासाठी बिबट्या विश्राम भवनाच्या आवारात काही वेळ मुक्तपणे संचार करताना दिसून येतो. शांतपणे परिसराची पाहणी केल्यानंतर त्याने तेथील एका कुत्र्याच्या लहान पिल्लावर झडप घालून ते पकडल्याचे दृश्यही कॅमेऱ्यात नोंदले गेले आहे. त्यानंतर बिबट्या त्या पिल्लाला घेऊन जंगलाच्या दिशेने पलायन करताना दिसतो.या घटनेमुळे शासकीय विश्राम भवनात वास्तव्यास असलेले कर्मचारी, पर्यटक तसेच आसपासच्या वस्त्यांमध्ये राहणारे नागरिक प्रचंड दहशतीखाली आले आहेत. चिखलदरा परिसर जंगलालगत असल्याने यापूर्वीही वन्यप्राण्यांचा वावर आढळून आला आहे; मात्र, थेट वस्ती व शासकीय इमारतींच्या परिसरात बिबट्याचा मुक्त संचार झाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात येत असून, पालकांमध्ये लहान मुलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे. स्थानिक नागरिकांकडून वनविभाग व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावणे, परिसरात गस्त वाढवणे तसेच नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.दरम्यान, या घटनेमुळे पर्यटनस्थळ असलेल्या चिखलदऱ्यात येणाऱ्या पर्यटकांमध्येही भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त केली जात आहे.

# नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या शंभराहून अधिक उमेदवारांना नोटीस
## निवडणूक खर्च सादर न केल्याने कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून एका महिन्याच्या आत निवडणूक खर्चाचा अहवाल सादर न केल्याने जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या शंभराहून अधिक उमेदवारांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, संबंधित नगरपालिकांनी उमेदवारांना अहवाल सादर करण्यासाठी एक आठवड्याची मुदत दिली आहे.




या नोटीसनंतरही उमेदवारांनी निवडणूक खर्चाचे अंतिम हिशेब सादर न केल्यास, तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जाईल. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत त्यांना पुन्हा नोटीस बजावण्यात येतील. जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल गेल्या महिन्यात १६ डिसेंबर रोजी घोषित झाला होता. या तारखेपासून एका महिन्याच्या आत सर्व उमेदवारांना आपापल्या निवडणूक खर्चाचे अंतिम हिशेब संबंधित तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात सादर करणे बंधनकारक होते. मात्र, शंभराहून अधिक उमेदवारांनी अद्यापही ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही.

या निवडणुकीत अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चिखलदरा, चांदूर बाजार, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, मोर्शी, वरुड आणि शेंदुरजनाघाट या १० नगरपालिका तसेच नांदगाव खंडेश्वर आणि धारणी या दोन नगरपंचायतींचा समावेश होता. यामध्ये एकूण १२ नगराध्यक्ष आणि २७८ नगरसेवक निवडून द्यायचे होते. नगराध्यक्षपदासाठी ६४, तर नगरसेवकपदासाठी १०४८ उमेदवार रिंगणात होते. यापैकी बहुसंख्य उमेदवारांनी आपला निवडणूक खर्च सादर केला आहे, परंतु शंभराहून अधिक उमेदवारांनी अद्यापही याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे संबंधित नगरपालिका प्रशासनाने त्यांना नोटीस बजावून एक आठवड्याची अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत खर्च सादर न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुन्हा नोटीस पाठवण्यात येतील.

नगरपालिका प्रशासन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बजावण्यात आलेल्या नोटीसनुसार उमेदवारांनी कार्यवाही न केल्यास, त्यांची माहिती थेट राज्य निवडणूक आयोगाला कळवण्यात येईल. जिल्हाधिकारी संबंधित उमेदवारांवर कारवाईची शिफारस करतील. या शिफारशीनुसार, राज्य निवडणूक आयोग संबंधित उमेदवारांना पुढील ६ वर्षांसाठी कोणतीही निवडणूक लढवण्यास बंदी घालू शकते.

# जन्म-मृत्यू दाखल्यांच्या विलंबाविरोधात काँग्रेसचा आवाज; आयुक्तांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागातील विलंब व गुंतागुंतीच्या प्रक्रियेविरोधात अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी विरोधी पक्षनेते बबलु शेखावत यांनी आयुक्तांना निवेदन दिले. जन्म किंवा मृत्यूचा दाखला मिळविण्यासाठी नागरिकांना झोन कार्यालये आणि मुख्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असून वेळ व पैशाची मोठी नासाडी होत असल्याचा आरोप त्यांनी केला.नुकत्याच सुरू झालेल्या प्रक्रियेनुसार झोन स्तरावर अर्ज स्वीकारून ते मुख्यालयात पाठविले जात असल्याने प्रक्रिया अधिकच गुंतागुंतीची झाली आहे. अनेक नागरिकांना १५ ते २० वेळा महानगरपालिकेत ये-जा करावी लागत असल्याचे नमूद करण्यात आले. करदाता नागरिकांना मूलभूत सेवा म्हणून सहज मिळायला हवा असा जन्म-मृत्यू दाखला मिळविण्यासाठी इतका त्रास सहन करावा लागणे लज्जास्पद असल्याचे शेखावत यांनी म्हटले.या समस्येची तात्काळ दखल घेऊन प्रक्रिया सुलभ करावी, विलंब दूर करावा व नागरिकांना जलद व सुलभ सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# जुना रेल्वे उड्डाणपूल पुनर्बांधणीच्या प्रक्रियेत अमरावतीकरांना लवकरच दिलासा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

शहरातील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला जुना रेल्वे उड्डाणपूल (आरओबी) पुनर्बांधणीच्या प्रक्रियेत असून येत्या काळात या पुलाचे काम वेगाने सुरू होणार असल्याची माहिती रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंग यांनी अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांना पत्राद्वारे दिली आहे. हा पूल २५ ऑगस्ट २०२५ पासून वाहतुकीसाठी बंद असून, त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे.सन १९६३ मध्ये बांधण्यात आलेला हा दोन पदरी रेल्वे उड्डाणपूल अनेक वर्षे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतुकीचा कणा राहिला आहे. मात्र, कालांतराने पुलाची अवस्था जीर्ण झाल्याने राज्य प्रशासनाने नेमलेल्या त्रयस्थ संस्थेकडून संरचनात्मक सुरक्षा मूल्यांकन करण्यात आले. या अहवालाच्या आधारे पुलावरून वाहतूक सुरू ठेवणे धोकादायक ठरू शकते, असे स्पष्ट झाल्यानंतर राज्य सरकारने २५ ऑगस्ट २०२५ पासून या उड्डाणपुलावरील वाहतूक पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेतला.पूल बंद झाल्यामुळे अमरावती शहरातील वाहतूक व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. इर्विन चौक, जयस्तंभ चौक, श्याम चौक, राजकमल चौक आणि मालवीय चौक या प्रमुख ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत आहे. कार्यालयीन वेळेत आणि सण-उत्सवांच्या काळात ही कोंडी अधिक तीव्र होत असून, नागरिकांना पर्यायी मार्गांचा आधार घ्यावा लागत आहे. वाहतूक पोलिसांकडून नियमनाचा प्रयत्न केला जात असला, तरी अपुऱ्या पर्यायी मार्गांमुळे सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर खासदार बळवंत वानखडे यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभेच्या शून्यकाळात जुना रेल्वे उड्डाणपूल पुनर्बांधणीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर लोकसभेतील प्रश्नोत्तरादरम्यान रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंग यांनी या पुलाची पुनर्बांधणी केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच, २८ जानेवारी २०२६ रोजी लेखी पत्र पाठवून अमरावतीकरांना लवकरच दिलासा मिळेल, असे आश्वासन देण्यात आले आहे.सध्या या आरओबीच्या पुनर्बांधणीचे काम मंजुरीच्या प्रक्रियेत असून, आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय बाबी पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असेही रेल्वे विभागाकडून कळविण्यात आले आहे. जुना उड्डाणपूल पुनर्बांधित झाल्यास शहरातील वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत होणार असून, नागरिकांना दीर्घकाळापासून भेडसावणाऱ्या वाहतूककोंडीपासून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ७०६ गावांना पाणीटंचाईची झळ बसण्याची शक्यता
## जलजीवन मिशनच्या अर्धवट कामांचा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दमदार पावसाळ्यानंतरही यंदा पाणटंचाई पिच्छा सोडणार नसल्याचे चित्र आहे. जिल्हा प्रशासनाच्या



तंबीनंतर अखेर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला जाग आली व दुसऱ्या टप्प्याचा कृती आराखडा सादर केला. यानुसार जानेवारी ते जून यादरम्यान किमान ७०६ गावांना पाणीटंचाईचे चटके बसणार आहेत. यासाठी ७१८ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या. यावर साधारण २० कोटींचा खर्च होईल.यंदा मेळघाटसह चार तालुके वगळता १० तालुक्यांमध्ये पावसाने सरासरी पार केलेली आहे. शिवाय ५६ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली. याशिवाय ऑक्टोबरपर्यंत सतत पाऊस पाऊस सुरू असल्याने जमिनीचे पुनर्भरण झाले. त्यामुळे भूजलस्तर पातळीत वाढ झाल्याने यंदा पाणीटंचाई भासणार नाही, असे चित्र होते. प्रत्यक्षात जीएसडीएच्या अहवालात भूजलस्तरात एक-दोन तालुक्यांतच वाढ व तेवढ्याच तालुक्यातच कमी झाली व उर्वरित १०-१२ तालुक्यात भूजलपातळी स्थिर होती. त्यामुळे पहिल्या टप्प्यात म्हणजेच ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत पाणीटंचाई उद्भवली नाही. मात्र, दुसऱ्या टप्प्यात म्हणजेच जानेवारी ते मार्चदरम्यान अखेरीस पाणीटंचाई भासणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.संभाव्य निवारणासाठी प्रशासनाद्वारा पाणीटंचाईच्या जिल्हा परिषद प्रत्येक पंचायत समितीकडून कामांच्या अनुषंगाने प्रस्ताव मागण्यात आले व याबाबत राबवायचा कृती आराखडा तयार केला आहे. यामध्ये विशिष्ट मर्यादेत जिल्हाधिकाऱ्यांनाप्रशासकीय मान्यतेचे अधिकार असल्याने कामे मार्गी लागणार आहेत. मात्र, निविदा प्रक्रिया लवकर झाल्यासच हे शक्य होणार आहे.

**२१ गावांत नवीन ९७ विंधनविहिरी**

दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील ९१ गावांतील नवीन २७ विंधनविहिरी व कूपनलिका तयार करण्यात येणार आहे. यासाठी किमान १.१३ कोटीचा खर्च होणार आहे. शिवाय २८२ गावांत २८६ नळ योजनांची विशेष दुरुस्ती करण्यात येणार आहे. याशिवाय चार गावांमध्ये तात्पुरत्या पूरक योजना घेण्यात येणार आहे.

# कर्जमाफीसाठी थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी सादर करा
## जिल्हा उपनिबंधकांचे बँकांना निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेची जिल्हास्तरावर अंमलबजावणी सुरू झाली असून, त्याअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांची सविस्तर यादी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने अमरावती जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, सहकारी व ग्रामीण बँकांना पत्र पाठवून थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती तातडीने सादर करण्यास सांगितले आहे.शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रब्बी हंगामासाठी ३० जून २०२५ पर्यंत तसेच खरीप हंगामासाठी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात येणार आहे. या यादीत शेतकऱ्यांचे नाव, खाते क्रमांक, कर्जाची एकूण रक्कम, थकीत रक्कम, कर्ज मंजुरीचा कालावधी तसेच हंगामनिहाय तपशील देणे बंधनकारक असल्याचे जिल्हा उपनिबंधकांनी पाठविलेल्या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.सध्या बँकांकडून माहिती संकलनाची प्रक्रिया वेगाने सुरू असून, अनेक बँकांनी प्राथमिक स्वरूपातील यादी सादर करण्यास सुरुवात केली आहे. बँकांकडून प्राप्त होणाऱ्या याद्यांची छाननी जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येणार असून, त्यानंतर ही अंतिम माहिती शासनाकडे पाठवली जाणार आहे. शासन स्तरावर पात्रतेची पडताळणी झाल्यानंतर अंतिम लाभार्थी यादी जाहीर करून प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.या कर्जमाफी निर्णयामुळे गेल्या काही वर्षांपासून कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच आगामी हंगामासाठी शेतीच्या कामाकरिता भांडवल उभारण्यास शेतकऱ्यांना मदत होणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकारने कर्जमाफी राबविली होती, ज्यामध्ये २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यामुळे सध्याच्या कर्जमाफीत २०२१ ते २०२५ या कालावधीतील कर्जदार शेतकऱ्यांचा समावेश होण्याची शक्यता आहे.कर्जमाफीची प्रक्रिया लवकरच प्रत्यक्षात येणार असल्याने जिल्ह्यातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# काँग्रेसच्या अंतर्गत वादामुळे जर भाजपचा महापौर झाला तर आघाडी तोडू- पप्पू देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४चंद्रपूर**

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसमधील अंतर्गत कलहाचा थेट फटका सत्तास्थापनेला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काँग्रेसशी निवडणूकपूर्व आघाडी असलेल्या जनविकास सेनेचे प्रमुख पप्पू देशमुख यांनी काँग्रेसला स्पष्ट इशारा दिला आहे. काँग्रेसच्या अंतर्गत मतभेदांमुळे भाजपचा महापौर निवडून आल्यास, त्या क्षणी काँग्रेससोबतची आघाडी तोडण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले आहे.

जनविकास सेनेचे चंद्रपूर महापालिकेत तीन नगरसेवक असून ६६ सदस्यांच्या सभागृहात बहुमतासाठी ३४ नगरसेवकांची आवश्यकता आहे. सध्या प्रत्येक नगरसेवक महत्त्वाचा ठरत असताना जनविकास सेनेच्या भूमिकेमुळे काँग्रेसच्या अडचणी वाढल्या आहेत.

पप्पू देशमुख यांनी इशारा देत सांगितले की, या निवडणुकीत ६६ पैकी ४२ नगरसेवक भाजपविरोधी विचारांचे निवडून आले असून ही निवडणूक भाजपविरोधी होती, हे काँग्रेसने लक्षात घ्यावे. आम्ही काँग्रेससोबत राहून शहराला स्वच्छ व पारदर्शक कारभार देण्याचे आश्वासन दिले आहे.

# सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे
## ठेकेदार-अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय; ग्रामस्थांची चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अचलपूर**

अचलपूर तहसील परिसरात नागरिकांच्या दैनंदिन सेवेसाठी सुरू असलेल्या सह दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणात ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.अनुसूचित जाती मोर्चाचे शहर अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते दिलीप अत्रा राऊत यांनी याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.प्रत्यक्ष पाहणीदरम्यान शासनाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकानुसार आवश्यक दर्जेदार बांधकाम साहित्य वापरण्यात येत नसल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. सिमेंटचे प्रमाण अपुरे ठेवण्यात येत असून, माती मिश्रित रेती, तसेच कमी मिलिमीटरच्या लोखंडी सळया वापरल्या जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.या प्रकारामुळे सदर इमारत भविष्यात धोकादायक ठरण्याची शक्यता असून, सार्वजनिक निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याची भावना नागरिकांतून



सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिकात्यांनी इस्टीमेन्ट मागितले असून, त्यांना आवश्यक माहिती दिली जात आहे. कुठेही निकृष्ट बांधकाम नाही. काम पूर्णपणे पी.डब्ल्यू.डी.च्या नियम व नियमानुसारच सुरू आहे. जागेच्या मर्यादेनुसार प्लांट छोटा असून, त्यास मंजुरी देण्यात आली आहे. वरच्या मजल्यावर रेकॉर्ड रूमसाठी दुसरा मजला प्रस्तावित आहे.

**शुभम आवारे,कनिष्ठ अभियंता,सा. बा. उपविभाग, अचलपूर**

---

तक्रारदाराची बाजूनिकृष्ट बांधकामाची तक्रार केल्यानंतर कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे माहिती अधिकारात अर्ज केला. मात्र जाणूनबुजून माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. माझ्याकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड असतानाही माझ्या पत्त्यावर शंका उपस्थित करण्यात आली.

**दिलीप राऊत,शहर अध्यक्ष,भा. ज. पा. अनुसूचित जाती मोर्चा, अचलपूर.**

---

व्यक्त होत आहे.हे बांधकाम तहसील कार्यालयाच्या हद्दीत, जनतेच्या सोयीसाठी सुरू असले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांकडून आवश्यक तांत्रिक देखरेख होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ठेकेदाराला मोकळीक दिल्यामुळेच कामाचा दर्जा खालावला असून, यामागे संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचे संगनमत असावे, असा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.या गंभीर प्रकरणी दिलीप राऊत यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज दाखल करून सविस्तर माहिती मागवली आहे. आरटीआय अर्जामध्ये सदर बांधकामाचा मंजूर अंदाजपत्रक, नकाशा व ड्रॉईंग, कंत्राट कोणाला देण्यात आले, तांत्रिक तपासणी अहवाल, तसेच यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारींचा तपशील मागवण्यात आला आहे.दरम्यान, आमदारांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात बांधकाम स्थळी आवश्यक माहिती दर्शवणारा सूचना फलकच लावण्यात आलेला नसल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. बांधकामाचे क्षेत्रफळ, मजल्यांची संख्या, मंजूर निधी, कंत्राटदाराचे नाव याबाबत कोणतीही माहिती नागरिकांना उपलब्ध नसल्याने संशय अधिक बळावला आहे.ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता असून, या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच निकृष्ट बांधकाम रद्द करून दर्जेदार पद्धतीने नव्याने बांधकाम करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.या प्रकारामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासन याबाबत कोणती ठोस भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत